# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६३ वे अंक ४०) पोस्टाचा परवाना नं. / अे / आर / ए.जी.डी. - ०७ / २०२३ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार, दि.३१ जानेवारी २०२४ (पाने ४) (किंमत २ रुपये)


## अशोक सराफ यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर



मुंबई दि.३० (प्रतिनिधी)- ज्येष्ठ मराठी चित्रपट आणि नाट्य अभिनेते अशोक सराफ यांना कला क्षेत्रातील भरीव योगदानासाठी २०२३ वर्षाचा मानाचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार देण्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे. मुख्यमंत्र्यांनी अशोक सराफ यांच्याशी बोलून त्यांचे अभिनंदनही केले. अशोक सराफ यांनी केवळ विनोदीच नव्हे तर गंभीर स्वरूपापासून ते खलनायकी प्रवृत्तीपर्यंत विविध छटांचे दर्शन आपल्या अभिनयातून घडविले आणि रसिकांवर अधिराज्य गाजवले असे मुख्यमंत्र्यांनी त्यांचे अभिनंदन करतांना म्हटले आहे. अशोक सराफ यांनी आत्तापर्यंत विविध सिनेमांमध्ये आणि नाटकांमध्ये अभिनय केला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या एक्स हँडलवरुन ही माहिती दिली आहे. अशोक सराफ यांनी विनोदी, गंभीर आणि खलनायकी भूमिकाही साकारल्या आहेत. तसंच आपल्या अभिनयातून रसिकांच्या मनावर राज्य गाजवलं आहे. अशोक सराफ हे एक लोकप्रिय अभिनेते आहेत. मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीमध्ये त्यांनी त्यांची कारकीर्द गाजवली आहे. लक्ष्मीकांत बेर्डे आणि अशोक सराफ यांची जोडी खूप गाजली होती. हम पांच या मालिकेतला त्यांचा अभिनय केला आहे. निवेदिता जोशी या त्यांच्या पत्नी आहेत.

# आरक्षणाचा मुद्दा संघर्षाच्या टोकावर; आरोप-प्रत्यारोप सुरु

## ...तर १० तारखेपासून बेमुदत उपोषण

### आम्हाला देखील ओबीसी आरक्षणाला चॅलेंज करावे लागेल; मनोज जरांगे यांचा इशारा

अहमदनगर/रायगड दि.३० (प्रतिनिधी)- आरक्षणाच्या मुद्यावर आता मराठा आणि ओबीसी संघटनांमधील मतभेद आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे. मराठा मोर्चानंतर राज्य सरकारने आरक्षणाबाबत दिलेल्या आश्वासनानंतर ओबीसी संघटना नाराज झाल्या असून राज्यात जनजागृती यात्रा काढण्याची घोषणा केली आहे. तर, दुसरीकडे आमच्या अन्नात माती कालवली तर आम्हाला देखील ओबीसी आरक्षणाला चॅलेंज कराव लागेल आणि आरक्षण रद्द झाल्यास आम्ही जबाबदार नसणार असा थेट इशारा मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी दिला आहे. अहमदनगरमध्ये बोलताना मनोज जरांगे यांनी ओबीसी संघटनांवर टीका केली.

मनोज जरांगे यांनी म्हटले की, ओबीसी बांधवांनी त्याला (छगन भुजबळ यांना) समजून सांगावं. त्याच्या एकट्यामुळे ओबीसींचं वाटोळं होणार आहे. जर त्यांनी आमच्या अन्नात माती कालवली तर आम्हाला देखील ओबीसी आरक्षणाला चॅलेंज कराव लागेल. आम्ही सुप्रीम कोर्टात गेल्यास ओबीसींचे पूर्णच्या पूर्ण २७ टक्के आरक्षण



रद्द होऊ शकते असा इशाराच जरांगे यांनी दिला.

मनोज जरांगे यांनी आज रायगड येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधी स्थळाचे दर्शन घेतल्यानंतर पत्रकारांशी संवाद साधला. मराठा समाजाला आरक्षण मिळावं म्हणून सगेसोयरे संदर्भात सरकारने काढलेल्या अधिसूचनेचं कायद्यात रुपांतर व्हावं. पुढील १५ दिवसांत विशेष अधिवेशन बोलावून हा कायदा पारीत करावा अशी मागणी मनोज जरांगे पाटलांनी केली आहे. मराठ्यांना सरसकट आरक्षण मिळालेलं नाही, अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली होती. यावरून मनोज जरांगे पाटलांनी सरकारला इशारा दिला आहे. आज रायगड येथे छत्रपती शिवाजी महाराजांचे आशीर्वाद घेतल्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. अधिसुचनेची तातडीने अंमलबजावणी सुरु केली नाहीतर १० फेब्रुवारीला पुन्हा बेमुदत उपोषणाला बसण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

'आज महाराष्ट्रातील मराठा समाजाला आणि सरकारला महत्त्वाचं सांगायचं आहे. मुख्यमंत्री आणि दोन्ही मुख्यमंत्र्यांना माझी विनंती आहे की सगेसोयऱ्यांची जी अधिसूचना काढली आहे, त्याची तातडीने अंमलबजावणी करायला पाहिजे. प्रमाणपत्र वाटपाला सुरुवात झाली पाहिजे. तुम्ही हरकती-सूचना मागितल्या असल्या तरी तातडीने अंमलबजावणी होणं आवश्यक आहे' 'पुढील १५ दिवसांत विशेष अधिवेशन बोलावून सगेसोयऱ्यांच्या अधिसूचनेचं कायद्यात रुपांतर करा. तसंच, तातडीने उद्यापासून या अधिसूचनेची अंमलबजावणी सुरू नाही केली तर १० फेब्रुवारीला बेमुदत उपोषण सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे', असा इशारा मनोज जरांगे पाटलांनी दिला आहे.

## 'जरांगे तू कोर्टात येच, दूध का दूध पानी का पानी होईल'; लक्ष्मण हाकेंचा थेट इशारा

मुंबई दि.३० (प्रतिनिधी)- ओबीसी आरक्षणाच्या विरोधात आम्हालाही नाईलाजाने याचिका दाखल करून हे आरक्षण रद्द करावे लागणार आहे आणि ते रद्द देखील होणार असल्याचा दावा करणाऱ्या मनोज जरांगे यांच्यावर मागासवर्ग आयोगाचे माजी सदस्य लक्ष्मण हाकेंनी जोरदार हल्लाबोल केला आहे. 'मनोज जरांगे तू कोर्टात येच, एकदा 'दूध का दूध पानी का पानी' होईल असे लक्ष्मण हाके म्हणाले आहेत.

दरम्यान याबाबत बोलताना लक्ष्मण हाके म्हणाले की, 'मनोज जरांगे यांनी ओबीसी समाजाला दिलेलं चॅलेंज आज काही वृत्तवाहिनीवर पाहण्यात आले. मनोज जरांगे म्हणतात की, आमच्या आरक्षणाला जर तुम्ही विरोध केला, तर आम्ही ओबीसीचा आरक्षण न्यायालयात चॅलेंज करून तुमचं आरक्षण रद्द करणार. त्यामुळे मनोज जरांगे तुला गोरगरीब मराठा समाजाच्या पोरांचं पडलेलं नाही. ओबीसी भटक्या विमुक्त जाती-जमातीच्या सामाजिक न्यायाच्या प्रतीक्षेत असलेल्या आणि ज्याचे हक्क, अधिकार डावलली गेली त्या माणसाला आमच्या समाजाने जे प्रावधान करून ठेवलं आहे. आरक्षणाच्या माध्यमातून आणि संविधानाच्या माध्यमातून जी प्रतिनिधित्वाची भाषा बोलली ती तुला संपवायची आहे. म्हणजेच आधुनिक कालावधीमध्ये तुला या ओबीसींच्या आरक्षणाला विरोध असल्याची टीका लक्ष्मण हाके यांनी केली.

पुढे बोलतांना लक्ष्मण हाके म्हणाले की,'एका बाजूला ओबीसीमधून आरक्षण मागायचं, दुसऱ्या बाजूला ओबीसी आरक्षणाला चॅलेंज करतो असं म्हणायचं. हे दोन्ही विरोधीभास वक्तव्य नाहीत का?, तुझ्याकडून ती औकातच नाही. त्यामुळे तू कोर्टात येच, तसेही खोटारडेपणा करून तुम्ही सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाचं उल्लंघन करून घुसखोरी करत आहात. तुम्ही खोटारडेपणा केला आहेच,' असेही हाके म्हणाले.

## मंत्रिमंडळाला विश्वासात न घेता मराठा आरक्षणाची अधिसूचना; विजय वडेट्टीवारांचा आरोप

मुंबई दि.३० (प्रतिनिधी)- मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबतची अधिसूचना काढण्यात आली. ही अधिसूचना काढण्याबाबतचा निर्णय मंत्रीमंडळ बैठकीत झाला नाही. मंत्रीमंडळाला विश्वासात न घेता मराठा समाजाचा नेता म्हणून मिरवण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी ही मराठा आरक्षणाबाबतची अधिसूचना काढली आहे. या अधिसूचनेमुळे ओबीसी समाजावर अन्याय झाला असून या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी येत्या २० फेब्रुवारीला संभाजीनगर येथे ओबीसींच्या विराट सभेचे आयोजन केले आहे. ही सभा ओबीसींच्या संविधानिक हक्काच्या रक्षणासाठी आहे. आरक्षण देण्यावरून सरकारमध्ये श्रेयवादाची लढाई सुरू असून या लढाईमुळे ओबीसी समाजाला उद्ध्वस्त करण्याचे पाप सरकारकडून केले जात आहे. असा हल्लाबोल करत आमचा मराठा समाजाच्या आरक्षणाला विरोधी नाही, असे विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी स्पष्ट केले.

मुंबई येथे आज ओबीसी समाजाच्या संघटनांची बैठक विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्या शासकीय निवासस्थानी आयोजित करण्यात आली होती. या बैठकीनंतर आयोजित पत्रकार परिषदेत वडेट्टीवार बोलत होते.

वडेट्टीवार म्हणाले की, गृहमंत्री म्हणतात भाजप आहे तोपर्यंत ओबीसींवर अन्याय होऊ देणार नाही. केंद्रीय मंत्री राणे म्हणतात स्वाभिमानी मराठा समाज कुणबी समाजामध्ये समाविष्ट होऊन आरक्षण घेणार नाही. मुख्यमंत्री म्हणतात की, आंदोलकांवरील सर्व गुन्हे मागे घेण्यात येतील. गृहमंत्री म्हणतात सरसकट गुन्हे मागे घेता येणार नाहीत. यावरून मुख्यमंत्री आणि गृहमंत्र्यांमधील विसंवाद दिसून येतो. हे सरकारच ओबीसी विरूद्ध मराठा हा वाद निर्माण करून दोन्ही समाजामध्ये संशयाचे वातावरण निर्माण करत आहे.

## मराठा समाजाच्या सर्वेक्षणास २ फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ

मुंबई दि.३० (प्रतिनिधी)- महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगामार्फत मराठा समाजाचे सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक मागासलेपण तपासण्यासाठी सर्वेक्षण करण्यात येत आहे. या सर्वेक्षणाचा कालावधी दि.३१ जानेवारी २०२४ पर्यत होता.

तथापि काही ठिकाणी सर्वेक्षणास आणखी कालावधीची आवश्यकता असल्याने या सर्वेक्षणासाठी दि.०२ फेब्रुवारी २०२४ पर्यत मुदतवाढ देण्यात येत असल्याची माहिती आयोगामार्फत प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे.

## 'वंचित'चा महाविकास आघाडीत समावेश

मुंबई दि.३० (प्रतिनिधी)- आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीकडून जोरात तयारी सुरू झाली आहे. तसंच, सत्ताधाऱ्यांविरोधात मोट बांधण्याकरता अनेक लहान-मोठ्या पक्षांना आघाडीत सामील करून घेतले जात आहे. गेल्या काही दिवसांपासून महाविकास आघाडीत सामील होण्याकरता वंचित बहुजन आघाडीकडून इच्छा व्यक्त केली जात होती. भाजपाविरोधात आपण सर्वांनी एकत्र आलं पाहिजे, असं वंचितचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकरांचं म्हणणं होतं. परंतु, महाविकास आघाडीतील इतर घटकपक्षांबरोबर वंचितचे असलेले राजकीय मतभेद पाहता हे गणित जुळून येणे कठीण होते. परंतु, आज (३० जानेवारी) वंचित बहुजन आघाडीला महाविकास आघाडीत सामील करून घेतले आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी यासंदर्भातील पोस्ट एक्सवर केली आहे.

आगामी लोकसभा निवडणुकीच्या जागा वाटपासंदर्भात चर्चा करण्याकरता महाविकास आघाडीकडून आज नरीमन पॉइंट येथील ट्रायडंट हॉटेलमध्ये बैठकीचं आयोजन करण्यात आलं. या बैठकीला वंचित बहुजन आघाडीलाही आमंत्रण देण्यात आलं. त्यानुसार, वंचितचे प्रवक्ते धैर्यवर्धन पुंडकर उपस्थित होते. महाविकास आघाडीमध्ये वंचित बहुजन आघाडी घटकपक्ष असल्याचं अधिकृत पत्र द्यावं अशी मागणी धैर्यवर्धन पुंडकर यांनी केली होती. त्यानुसार, ठाकरे गटाचे संजय राऊत, काँग्रेसचे नाना पटोले आणि राष्ट्रवादीचे शरद पवार यांच्या सह्यानिशी महाविकास आघाडीच्या पत्रावर वंचित बहुजन आघाडीला महाविकास आघाडीत समाविष्ट करून घेण्यात आल्याचे अधिकृतरित्या जाहीर करण्यात आले आहे.

महाविकास आघाडीची पुढची बैठक ही २ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आली आहे. त्यावेळी वंचितच्या वतीने प्रमुख डॉ. प्रकाश आंबेडकर हे स्वतः त्यासाठी हजर राहणार असल्याची माहिती समोर येत आहे.

बैठकीनंतर संजय राऊत म्हणाले की, सकाळपासून प्रदीर्घ चर्चा झाली आहे. आमच्या महाविकास आघाडीमध्ये सीपीएम, सीपीआय, आप, जनता दल युनायटेड, वंचित बहुजन आघाडी, समाजवादी पार्टी या सगळ्यांचा समाविष्ट महाविकास आघाडीत झाला आहे. त्यामुळे आघाडी अधिक मजबूत झालेली आहे.

## उत्तरप्रदेशमधील समाजवादीकडून उमेदवारांची पहिली यादी जाहीर!

नवी दिल्ली दि.३० (वृत्तसंस्था)- भाजपाला पराभूत करण्यासाठी विरोधक इंडिया आघाडीच्या रुपात एकत्र आले आहेत. गेल्या अनेक दिवसांपासून इंडिया आघाडीच्या घटकपक्षांत लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने जागावाटपावर चर्चा सुरू आहे. मात्र संयुक्त जनता दलाचे प्रमुख नितीश कुमार यांनी इंडिया आघडीतून बाहेर पडत एनडीत सामील होण्याचा निर्णय घेतला. या निर्णयानंतर आता इंडिया आघाडीत अस्वस्थता निर्माण झाली आहे. नितीश कुमार यांच्या या निर्णयामुळे इंडिया आघाडीचा प्रयोग यशस्वी ठरणार का? असा प्रश्न विचारला जात आहे. असे असतानाच आता उत्तर प्रदेशमधील समाजवादी पार्टीनेही मोठा निर्णय घेतला आहे. या पक्षाने आगामी लोकसभा निवडणुकीसाठी आपल्या उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. या यादीमुळे आता इंडिया आघाडीत आणखी अस्वस्थता निर्माण झाली आहे.

समाजवादी पार्टीने आपल्या पहिल्या यादीत एकूण १६ जागांसाठी उमेदवार दिले आहेत.

## भाजपाच्या दबावापुढे नितीशकुमार झुकले-राहुल गांधी

नवी दिल्ली दि.३० (वृत्तसंस्था)- बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी इंडिया आघाडीतून बाहेर पडून भाजपासह सरकार स्थापन केल्यानंतर आज पहिल्यांदाच राहुल गांधी यांनी त्यांच्यावर जाहीर भाष्य केले. राहुल गांधी यांची भारत जोडो न्याय यात्रा बिहारमध्ये पोहोचली आहे. बिहारच्या पुर्णिया जिल्ह्यात आज जाहीर सभेला संबोधित करत असताना राहुल गांधी यांनी नितीश कुमार यांच्यावर टीकास्त्र सोडले. नितीश कुमार इंडिया आघाडीतून बाहेर का पडले? याचे कारण सांगतानाच राहुल गांधी यांनी नितीश कुमार यांच्या कोलांटउड्याबाबत बिहारमध्ये एक विनोद तयार झाला असल्याचेही सांगितले.

'नितीश कुमार कुठे फसले? हे मी तुम्हाला सांगतो. बिहारमध्ये जातनिहाय सर्व्हे करावा, अशी मागणी आम्ही नितीश कुमार यांच्याकडे केली होती. काँग्रेस आणि राष्ट्रीय जनता दलाने नितीश कुमार यांच्यावर दबाव टाकून सर्व्हे करून घेतला. पण दुसऱ्या बाजूनेही त्यांच्यावर दबाव आला. कारण भाजपाला या देशात जातनिहाय सर्व्हे करायचा नाही. या देशात



दलित, आदिवासी, वंचित यांची संख्या किती? हे भाजपाला जाणून घ्यायचे नाही. त्यामुळे भाजपाच्या दबावापुढे नितीश कुमार झुकले. भाजपाने त्यांना मार्ग दाखविला आणि नितीश कुमार त्या मार्गाने चालू पडले', असे भाष्य राहुल गांधी यांनी जाहीर सभेत केले.

राहुल गांधी पुढे म्हणाले, 'भाजपाला सामाजिक न्यायाचे तत्त्व मान्य नाही. पण इंडिया आघाडी म्हणून आम्ही सामाजिक न्यायाची भूमिका मांडत राहू आणि त्यासाठी आम्हाला नितीश कुमार यांची गरज नाही.' राहुल गांधी यांनी यावेळी म्हणाले की, आम्ही देशातील बेरोजगारी आणि आर्थिक विषमतेकडेही लक्ष वेधले. सत्ताधारी भाजपा या प्रश्नांची सोडवणूक करण्याऐवजी द्वेषाची पेरणी करत आहे. ज्यामुळे सामाजिक आणि आर्थिक विषयाकडून दुर्लक्ष होत असल्याचीही टीकाही राहुल गांधी यांनी केली.

## राज्यातील राज्यसभेच्या सहा जागांच्या निवडणुकीसाठी महायुती सज्ज

मुंबई दि.३० (प्रतिनिधी)- राज्यसभेची निवडणूक जाहीर होताच आता सर्वच पक्षाच्या हालचाली देखील वाढू लागल्या आहेत. महायुतीने तशी तयारी देखील सुरू केली असून, पाच जागा कोणत्याही परिस्थितीत निवडून आणण्यासाठीचा निर्धार महायुतीने केला आहे.

निवडणूक आयोगाने राज्यसभेच्या रिक्त होणाऱ्या ५६ जागांसाठी निवडणूक जाहीर केली आहे. यामध्ये महाराष्ट्रातील सहा जागा रिक्त होत आहेत. भाजप, शिवसेना (शिंदे गट) आणि अजित पवार गटाने मोर्चे बांधणी देखील सुरू केली आहे. भाजपने तर त्यांच्या तीन उमेदवारांची चाचपणी देखील सुरू केली असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.यामध्ये भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांचे नाव आघाडीवर असल्याची खात्रीलायक सूत्रांची माहिती आहे. विनोद तावडेंसोबतच भाजप नेत्या पंकजा मुंडे आणि विजया रहाटकर यांच्या नावाची चर्चा आहे. आता केंद्रीय नेतृत्व लवकरच नावावर शिक्कामोर्तब करणार असल्याची माहिती भाजपमधील सूत्रांनी दिली आहे.

## नक्षलवाद्यांच्या चकमकीत तीन जवान शहीद तर १३ जण जखमी

रायपूर दि.३० (प्रतिनिधी)- छत्तीसगडमध्ये सुरक्षा दल आणि नक्षलवाद्यांमध्ये झालेल्या भीषण चकमकीत १३ पोलीस कर्मचारी जखमी झाल्याची घटना घडली आहे. तर, तीन जवानांनी आपल्या प्राणांचे सर्वोच्च बलिदान दिले आहे. नक्षलवाद्यांनी सुकमा जिल्ह्यातील जगरगुंडा पोलीस ठाण्याच्या अंतर्गत येणाऱ्या टेकुलागुडेम गावात नव्याने स्थापन केलेल्या सुरक्षा छावणीवर हल्ला केला. त्यावेळी १३ पोलीस कर्मचारी जखमी झाले. ही छावणी स्थानिक जनतेला मूलभूत सुविधा पुरविण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आली होती.

जखमी जवानांना हेलिकॉप्टरने जगदलपूर रेफरल हॉस्पिटलमध्ये हलवण्यात आले आहे. संघर्षग्रस्त भागातील स्थानिक समूदायाला मदत करण्यासाठी टेकुलागुडेम गावात नवीन सुरक्षा शिबिराचे उद्घाटन करण्यात आले होते.

बस्तर परिक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक सुंदरराज पी. म्हणाले की, बस्तर पोलीस आणि तैनात सुरक्षा दले परिसरातील लोकांना नक्षल समस्येपासून मुक्त करण्यासाठी कटिबद्ध आहेत. २०२१ साली टेकलगुडेम चकमकीत मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असले तरी, जनहितार्थ आम्ही पुन्हा टेकलगुडेम गावात छावणी स्थापन करू आणि परिसराची शांतता, सुरक्षा आणि विकासासाठी समर्पितपणे काम करू.

## चंदीगड महापौर निवडणुकीत भाजपचा चमत्कार

चंदीगड दि.३० (वृत्तसंस्था)- लोकसभा निवडणुकीआधी इंडिया आघाडीची लिटमस चाचणी म्हणून समजल्या जाणाऱ्या चंदीगड महापौरपदाच्या निवडणुकीत भाजपने बाजी मारली आहे. भाजपच्या उमेदवाराने आम आदमी पक्ष आणि काँग्रेसच्या उमेदवाराचा पराभव केला. भाजप उमेदवार मनोज सोनकर यांना १६ मते मिळाली. या निवडणुकीनंतर आप-काँग्रेसने निवडणूक अधिकाऱ्यांवर गंभीर आरोप केले आहेत. निवडणूक अधिकाऱ्यांनी इंडिया आघाडीची मते जाणीवपूर्वक अवैध ठरवले असल्याचा आरोप करण्यात येत आहे. आप-काँग्रेस उमेदवार कुलदीप कुमार यांना १२ मते मिळाली. त्यांना २० मते मिळणे अपेक्षित होते.

चंदीगड महापालिकेत भाजपचे १४ नगरसेवक आहेत. संख्याबळाच्या दृष्टीने भाजप सर्वात मोठा पक्ष आहे. यानंतर १३ नगरसेवकांसह चंदीगड महापालिकेत 'आप' हा दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष आहे. काँग्रेसचे ७ तर शिरोमणी अकाली दलाचे एक नगरसेवक आहेत. चंदीगड महापौर निवडणुकीत स्थानिक खासदारांनाही मतदानाचा अधिकार आहे. भाजपच्या किरण खेर या येथील खासदार आहेत, त्यांनी मतदान केले आहे.

## विरोधी पक्षांच्या सर्व १४६ खासदारांचे निलंबन रद्द

नवी दिल्ली दि.३० (वृत्तसंस्था)- संसदेच्या सुरक्षा व्यवस्थेवरून गोंधळ घालणाऱ्या विरोधी पक्षांच्या निलंबित १४६ खासदारांना बुधवारपासून सुरू होणाऱ्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात भाग घेता येणार आहे. गेल्या अधिवेशनात विक्रमी संख्येने १४६ खासदार निलंबित झाले होते. त्यापैकी मागील अधिवेशनाच्या काळापुरते निलंबित झालेल्या खासदारांना उद्यापासून अधिवेशनात सहभागी होता येणार आहे. उर्वरित ११ राज्यसभा खासदारांना विशेषाधिकार समितीने दोषी ठरल्याची माहिती आहे. परंतु उपराष्ट्रपतींनी आपले अधिकार वापरून त्यांचे निलंबन रद्द केले आहे. त्यामुळे सर्व खासदार अधिवेशनात सहभागी होऊ शकणार आहेत.

विरोधी पक्षांच्या १४६ पैकी १३२ खासदारांना केवळ हिवाळी अधिवेशनासाठी निलंबित करण्यात आले होते, त्यामुळे हे निलंबन पुढील अधिवेशनात म्हणजेच अर्थसंकल्पीय अधिवेशनात आपोआप संपुष्टात आले आहे. उर्वरित १४ खासदारांना विशेषाधिकार समित्यांनी त्यांचा निर्णय होईपर्यंत निलंबित केले होते.

१४ खासदारांपैकी ३ लोकसभेचे आणि ११ राज्यसभेचे होते. त्यांची प्रकरणे लोकसभेच्या विशेषाधिकार समितीकडे पाठवण्यात आली असून समितीचा निर्णय होईपर्यंत त्यांना निलंबित करण्यात आल्याचे सांगण्यात आले. लोकसभेच्या विशेषाधिकार समितीने ११ जानेवारी रोजी लोकसभा खासदारांचे निलंबन रद्द केले.

# वृक्ष संवर्धनाची चळवळ होणार व्यापक!

झाडे, पर्यावरणातील अत्यंत महत्त्वाचा घटक. त्यातही मनुष्यप्राण्यांचा प्राणवायू. झाडे जगली तरच मनुष्य जगेल असे इतके साधे सोपे गणित आहे. पण, हेच गणित गेल्या काही वर्षात मानव विसरला आहे. विकासाच्या नावाखाली झाडांच्या कत्तलीवर कत्तली केल्या जात आहेत. मेट्रो, मोनो, समृद्धी मार्ग, कोस्टल रोड, रस्ते, उड्डाणपूल असे एक ना अनेक प्रकल्प झाडांच्या मुळावर उठले आहेत. मुंबईत तर पायाभूत सुविधांसाठी मोठ्या संख्येने झाडांची कत्तल केली जात आहे. मेट्रो-३ प्रकल्पातील आरे कारशेडमधील झाडांच्या कत्तलीचा वाद सर्वज्ञात आहे. मात्र, त्याचवेळी झाडांचे महत्त्व वा झाडे जगली पाहिजेत याचे गांभीर्य अनेकांना नाही. त्यामुळेच झाडे जगवण्यासाठी वा झाडांच्या संवर्धनासाठी पुढे यायला हवे, ही जनभावना अद्यापही रुजलेली नाही. असे असताना आता वृक्षसंवर्धनाची चळवळ रुजण्याचीच नव्हे, तर व्यापक होण्याचीही शक्यता आहे. याचे कारण म्हणजे महाराष्ट्रात होणारे पहिले वृक्ष संमेलन.

साहित्य संमेलन, नाट्य संमेलन, गझल संमेलन, शिक्षक संमेलन, राजकीय कार्यकर्त्यांचे संमेलन, कर्मचाऱ्यांचे संमेलन यासह अनेक संमेलने होत असतात. पण, वृक्ष संमेलन असेही काही असू शकते, ही कल्पनाही कुणी केली नसेल. पण, ही कल्पना केवळ सुचली नसून आता प्रत्यक्षातही आणली आहे आणि हे महत्त्वाचे काम केले अभिनेता सयाजी शिंदे यांनी. सयाजी शिंदे हा कलाकार गेली कित्येक वर्षे झाडे जगवण्यासाठी, झाडांचे संवर्धन करण्यासाठी झटत आहे. राज्यात कोटीच्या संख्येने झाडे लावण्याचा आणि ती जगवण्याचा संकल्प करत सयाजी शिंदे बीडमधील पालवण येथील वनविभागाच्या २०० हेक्टर जागेवर वृक्ष लागवडीचा प्रकल्प राबवत आहे. सह्याद्री देवराई असे त्याने या प्रकल्पाला नाव दिले असून, येथे आतापर्यंत पावणेदोन लाख वृक्षांची लागवड करण्यात आली आहे. तर आता लवकरच येथे ऑक्सिजन झोनही तयार होणार आहे.

त्यांचीही वृक्ष लागवडीची आणि वृक्ष संवर्धनाची चळवळ व्यापक करण्यासाठी सयाजी शिंदेने वृक्ष संमेलनाची घोषणा नुकतीच केली आहे. झाडांचे संमेलन? असे कुणालाही ऐकल्याबरोबर वाटले, पण हो, खरेच आहे, हे झाडांचे संमेलन आहे, माणसांनी भरवलेले, झाडांना जगवण्यासाठी. बीडमध्ये जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात पहिले वृक्ष संमेलन होणार आहे. संमेलनासाठी मोठी जय्यत तयारी करण्यात येत आहे. या संमेलनात सर्वसामान्य नागरिकच नव्हे, तर शालेय-महाविद्यालयीन विद्यार्थीही सहभागी होणार आहेत. महत्त्वाचे म्हणजे, झाडांच्या रोपांची, झाडांची माहिती देणारे असे ५० स्टॉल असणार आहेत. तर फुलपाखरांच्या विविध जातींचे छायाचित्र प्रदर्शनही यावेळी भरवण्यात येणार आहे. तर या संमेलनात वृक्ष लागवड, वृक्ष संवर्धन, पर्यावरणातील झाडांचे महत्त्व आणि विकासकामांसाठी होणारी झाडांची कत्तल या आणि अशा अनेक विषयांवर ऊहापोह होण्याची शक्यता आहे.

या वृक्ष संमेलनाच्या निमित्ताने एक नवी आशा आता नक्कीच वृक्ष संवर्धनासाठी झटणाऱ्यांसाठी, पर्यावरणप्रेमींसाठी निर्माण होणार आहे. खऱ्या अर्थाने मुंबईत मोठ्या संख्येने झाडांची कत्तल होत आहे. विकासकामांसाठी बेसुमार कत्तल आतापर्यंत करण्यात आली असून, यापुढेही होणार आहे. पण, त्यातही मुंबईचे फुप्फुस म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आरेवरच आता घाला घातला जात आहे. आरे जंगल नष्ट झाले, तर मुंबईतील पर्यावरणाचा प्रश्न मोठा गंभीर होणार असल्याने पर्यावरणप्रेमींनी या विरोधात आवाज उठवण्यास सुरुवात केली. ही सुरुवात झाली ती पाच वर्षापूर्वी 'सेव्ह आरे'च्या माध्यमातून. पण, गेल्या एक-दीड वर्षापर्यंत तरी मुंबईत झाडे वाचवण्यासाठी अशी काही चळवळ उभी राहिली होती, हे निम्म्याहून अधिक मुंबईकरांना माहीतच नव्हते. पण, मेट्रो-३ विरोधात न्यायालयामध्ये याचिकांवर याचिका दाखल झाल्यानंतर आणि आरेमध्ये आंदोलने-निदर्शने वाढल्यानंतर मुंबईकरांना हळूहळू याविषयी माहिती होऊ लागली.

त्यातही काही दिवसांपूर्वी आरेतील झाडांच्या कत्तलीला उच्च न्यायालयाने परवानगी दिल्यानंतर एमएमआरसीने क्रूरपणे काही तासांतच रात्रीच्या अंधारात झाडांची कत्तल केली. यानंतर शेकडोंच्या संख्येने आरेतील रस्त्यांवर पर्यावरणप्रेमींसह सर्वसामान्य नागरिकही उतरले आणि मग झाडे वाचवण्यासाठीची सेव्ह आरेची ही चळवळ मुंबईकरांना खऱ्या अर्थाने माहीत झाली. एकूणच काय, तर या सेव्ह आरेने मुंबईकरांना झाडांचे महत्त्व आणि झाडे वाचवण्यासाठीची चळवळ याची तोंडओळख करून दिली आहे. तर आता या वृक्ष संमेलनाच्या माध्यमातून मुंबईकरांनाच नव्हे, तर राज्यातील सर्वानाच वृक्ष लागवडीचे आणि वृक्ष संवर्धनाचे महत्त्व पटणार आहे. तेव्हा या पहिल्या, अनोख्या वृक्ष संमेलनाचे अनेकांना वेध लागले असतील. या वृक्ष संमेलनात मोठ्या संख्येने सहभागी होत आपली पर्यावरणाप्रतीची संवेदना व्यक्त करण्याची संधीही अनेकांना या संमेलनाच्या निमित्ताने मिळणार आहे. त्यामुळे चला, मोठ्या संख्येने या वृक्ष संमेलनात सहभागी व्हा. काही कारणाने जमलेच नाही, तर यातून प्रेरणा घेत झाडे लावण्याचा आणि झाडे वाचवण्याचा संकल्प करत, तो प्रत्यक्षात उतरवण्याचा प्रयत्न या नववर्षाच्या निमित्ताने करा, हेच यानिमित्ताने सांगणे.

# भारताला संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेमध्ये स्थायी सदस्यत्व मिळायला हवे

**भारताला** संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेमध्ये स्थायी सदस्यत्व मिळावे यासाठी अनेक वर्षांपासून भारताचे प्रयत्न सुरू आहे व यासाठी प्रतिकुल परिस्थिती सुध्दा आहे.संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेमध्ये(यूएनएससी) भारताला स्थायी सदस्यत्व मिळावे अशी इच्छा ब्रिटन, फ्रान्स, रशिया,अमेरिका यांची सुध्दा आहे.परंतु भारताच्या स्थायी सदस्यत्वासाठी चीनचा कडाडून विरोध पुर्वीही होता आणि आजही आहे.भारत अनेक वर्षांपासून संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेमध्ये स्थायी सदस्यत्व मिळवण्यासाठी प्रयत्न करीत आहे.पण स्थायी सदस्यत्व मिळण्याच्या भारताच्या प्रयत्नांना प्रामुख्याने चीनकडून विरोध झाला आहे, चीनने भारताचा संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेमध्ये समावेश रोखण्यासाठी त्यांच्या व्हिटो अधिकाराचा वापर केला आहे.असे असतांनाही अमेरिका, फ्रान्स, रशिया व ब्रिटन या स्थायी सदस्यांनी भारताच्या उमेदवारीला पाठिंबा दर्शविला आहे.परंतु जोपर्यंत हे पाचही देश एकमताने भारताच्या स्थायी सदस्यत्वाला जाहीर पाठिंबा देत नाही तोपर्यंत भारताला स्थायी सदस्यत्व मिळने कठीण आहे.कारण चीन भारताचा कट्टर वैरी आहे.त्यामुळे भारत पुढे जावा व प्रगती व्हावी असे चीनला कदापि वाटत नाही.परंतू भारताला स्थायी सदस्यत्व मिळाले पाहिजे याकरिता चीनवर जागतिक दबाव येत असल्याचे दिसून येते. यासाठी टेस्लाचे सीईओ अब्जाधीश उद्योगपती एलन मस्क भारताला संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेमध्ये स्थायी सदस्यत्व मिळावे यासाठी चीनला फटकारल्याचे समजते.कारण टेस्लाचे सीईओ अब्जाधीश उद्योगपती एलन मस्क यांनी संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत स्थायी सदस्य म्हणून भारताला सहभागी करून न घेतल्याबद्दल नाराजी व्यक्त केली आहे.त्यांनी हेही म्हटले आहे की संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेमध्ये भारताला सहभागी न करून घेणे म्हणजे मूर्खपणा आहे.

संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेमध्ये जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या राष्ट्राचे पुरेसे प्रतिनिधित्व नसल्याचे सांगत त्यामध्ये फेरबदल करण्याची मागणी मस्क यांनी केली.संयुक्त राष्ट्राच्या संस्थांमध्ये सुधारणा करण्याची गरज आहे.परंतु समस्या अशी आहे की ज्यांच्याकडे सर्वात जास्त ताकद आहे ते ती समस्या सोडविण्यास तयार नाहीत.जगातील सर्वाधिक लोकसंख्येचा देश भारत असुनही व सर्वच बाबतीत सक्षम असतांना सुरक्षा परिषदेत कायमस्वरूपी स्थान न मिळणे हा तर मूर्खपणा आहे,असे एलन मस्क यांनी एक्स (पूर्वीचे ट्विटर) वरील पोस्टमध्ये म्हटले आहे.१ जानेवारी २०२१ रोजी भारत संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेचा अस्थायी सदस्य झाला.

संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेमध्ये ५ स्थायी सदस्य असतात.त्याचप्रमाणे १० अस्थायी सदस्य सुध्दा असतात या १० मध्ये भारताचा समावेश आहे. परंतु या १० अस्थायी सदस्यांचा कालावधी फक्त दोन वर्षांचा असतो.परंतु स्थायी (कायम) सदस्याप्रमाणे व्हेटोचे अधिकार अस्थायी सदस्य देशांना नसतात.भारत बऱ्याच वर्षांपासून संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या कायम स्वरुपी (स्थायी)सदस्याचा आग्रह करीत आहे.त्याचप्रमाणे जगातील अनेक देश स्थायी सदस्यांची संख्या वाढविण्याची मागणी करीत आहे. परंतु चीन नेहमीच यामध्ये अडंगा टाकतांना दिसतो.कारण स्थायी सदस्यांची संख्या वाढली तर संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेमध्ये स्थायी सदस्यत्वाचा पहिला अधिकार भारताचा राहिल आणि हे चीनला कदापि सहन होणार नाही. त्यामुळे चीन भारता विरूद्ध आपली घृणास्पद चाल नेहमीच खेळत असतो.परंतु जगातील वाढती अस्थिरता लक्षात घेता स्थायी सदस्यांची संख्या वाढविणे अत्यंत गरजेचे आहे.

संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेचे काम आणखी पारदर्शी व्हावे यासाठी जी-४ देश ब्राझील, जर्मनी, भारत आणि जपान यांनी स्थायी सदस्यत्वासाठी संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेकडे आग्रही भूमिका मांडली आहे.संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेमध्ये ब्रिटन, अमेरिका, फ्रान्स, रशिया आणि चीन हे सध्या पाच स्थायी सदस्य देश आहेत.या राष्ट्रांना ठरावांना व्हिटो करण्याच्या क्षमतेसह महत्त्वपूर्ण अधिकार आहेत. दोन वर्षांच्या कालावधीसाठी निवडून आलेल्या गैरस्थायी सदस्यांचा परिषदेच्या अजेंड्यात सहभाग असतो.पण त्यांच्या स्थायी सदस्यांसाठी असलेल्या व्हिटोचा अधिकार मिळत नाही.

संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेची स्थायी सदस्यांची पाच पेक्षा जास्त सदस्य नसावे अशी जर भुमिका चीनची असेल तर तीला संकुचित परिषद म्हणावी लागेल.त्यामुळे अमेरिका, फ्रान्स, रशिया व ब्रिटन यांनी संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेमधील स्थायी सदस्यांची संख्या वाढविण्यावर भर दिला पाहिजे.

तेव्हाच जगात एक चांगला संदेश जाईल आणि जागतिक सुरक्षिततेच्या बाबतीत सविस्तर चर्चा करता येईल व ठोस निर्णय घेण्यास मार्ग मोकळा होईल. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेमध्ये भारताच्या स्थायी सदस्यत्वासाठी वाढता जागतिक पाठिंबा ही भारतासाठी प्रगतीची मोठी वाटचाल म्हणावी लागेल.

**– रमेश कृष्णराव लांजेवार**
(माजी विद्यापीठ प्रतिनिधी, नागपूर)

# शेतकऱ्यांसाठी वरदान नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प

**शेतकऱ्यांनी केवळ शेतीवर अवलंबून न राहता त्यांना शेतीशी निगडित पूरक व्यवसाय करण्यास प्रोत्साहन देणे, मदतीसाठी मार्गदर्शन, तंत्रज्ञान, अनुदान उपलब्ध करुन देणे यासाठी जागतिक बँकेच्या अर्थ सहाय्याने सुरु केलेल्या नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोकरा) निवडक जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. त्याचे सकारात्मक दृश्य परिणाम दिसून येत आहेत. अशा या योजनेची माहिती देणारा हा लेख...**

**जागतिक** बँक अर्थसहाय्यित नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प राज्याच्या निवडक जिल्ह्यांमध्ये हवामान-अनुकूल शेती आणि अल्पभूधारक शेतकरी यांची शेती किफायतशीर करण्यासाठी राबविण्यात येत आहे. ह्या प्रकल्पात राज्यातील अकोला, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, बीड, नांदेड, हिंगोली, लातूर, धाराशिव, परभणी, वर्धा, वाशीम, यवतमाळ, बुलडाणा, जळगाव, जालना व नाशिक या १६ जिल्ह्यांमधील ५२२० अवर्षणप्रवण गावांचा समावेश असून यामध्ये पूर्णा नदीच्या खोऱ्यातील ९३२ खारपाण गावांचा समावेश आहे. या प्रकल्पाची मंजूर किंमत रु. ४००० कोटी होती. मात्र प्रकल्पाची यशस्विता व थेट लाभ हस्तांतरण प्रणालीवर प्राप्त झालेल्या अर्जांच्या दायित्वाच्या अनुषंगाने रु. ५४६९ कोटींच्या सुधारित प्रकल्प खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

जागतिक बँक अर्थसहाय्यित नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या यशस्वितेमुळे प्रकल्पामध्ये सद्य:स्थितीत समाविष्ट असलेल्या १६ जिल्ह्यांसह विदर्भातील उर्वरित नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली अशा एकूण २१ जिल्ह्यांमध्ये रु. ६००० कोटी किंमतीचा प्रकल्पाचा दुसरा टप्पा राबविण्यास शासनाने तत्वतः मान्यता दिली असून गाव निवड समितीच्या बैठकीत प्राप्त निर्देशांनुसार हवामानास अधिक संवेदनशील गावसमूह व त्यामधील गावे यांची निवड करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही सुरू आहे.

**प्रकल्प उद्देश, क्षेत्र व व्याप्ती**

प्रकल्प उद्देश : महाराष्ट्रातील निवडक जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना हवामान बदलांमुळे उद्भवलेल्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास सक्षम करणे आणि शेती व्यवसाय किफायतशीर करण्यास सहाय्य करणे.

प्रकल्पामध्ये छत्रपती संभाजीनगर (४०५), बीड (३९१), जालना (३६३), जळगाव (४५४), लातूर (२८०), धाराशिव (२८३), परभणी (२७५), नांदेड (३८४), हिंगोली (२३६), अमरावती (५१६), अकोला (४८७), बुलडाणा (४२८), वाशीम (१४९), यवतमाळ (३०२), वर्धा (१२५) व नाशिक जिल्ह्यातील मालेगाव तालुका (१४२ गावे) अशा एकूण १६ जिल्ह्यातील ५२२० गावे समविष्ट आहेत.

प्रकल्प अंमलबजावणीसाठी सर्वसमावेशक व गरजांवर आधारित कार्यपद्धती गाव हा घटक मानून प्रकल्पाचे लोकसहभागीय नियोजन करणे. ग्रामपंचायतीच्या उपसमितीकडे (ग्राम कृषी संजीवनी समिती) निर्णय प्रक्रिया, प्रकल्प समितीमध्ये ग्रामपंचायत कायद्यानुसार सर्व घटकांना पुरेसे प्रतिनिधित्व - महिला ५० टक्के, कृषी विभागाच्या तांत्रिक सहकार्याने प्रकल्प समिती गावचा विकास आराखडा तयार करते. प्रकल्पाच्या सहाय्याने बदलत्या हवामानात शेतीसाठी करावयाच्या गुंतवणुकीचा आराखडा पाण्याचा ताळेबंद, शेतीसाठी पाणी, जमिनीचे आरोग्य व्यवस्थापन, पिकांसाठी नवीन तंत्रज्ञान, कृषी व्यवसाय आणि शेतकऱ्यांची क्षमता बांधणी या बाबींवर भर. मागणी नुसार लाभ या तत्वावर अंमलबजावणी. महिला शेतकऱ्यांचा सहभाग वाढविण्यासाठी प्रत्येक प्रकल्प गावात कृषिताईचे नामनिर्देशन. ऑनलाईन व कागदविरहित प्रणालीचा वापर.

प्रकल्पाची वित्तीय स्थिती जागतिक बँकेच्या करारानुसार मूळ प्रकल्पाची किंमत रु. ४ हजार कोटी असून राज्य शासनाने घेतेलेल्या निर्णयानुसार सुधारित प्रकल्प किंमत रु. ५हजार ४६९ कोटी इतकी आहे. शासनाकडून आजअखेर रु. ४ हजार ८७०.५८ कोटी प्राप्त झाला असून आज अखेर रु. ४ हजार ६७८ कोटी खर्च करण्यात आला आहे. जागतिक बँकेकडून ७० टक्के हिश्श्याप्रमाणे रु. २७५७.४९ कोटी (३५६.४३ दशलक्ष डॉलर) इतका परतावा प्राप्त. जागतिक बँकेकडून उचलेल्या कर्जाची परतफेड करावयाचा कालावधी मे, २०२४ पासून १८ वर्षांचा आहे. प्रकल्पातून दिलेले लाभ प्रकल्प गावातील ४ लाख ८५ हजार ३६० वैयक्तिक शेतकऱ्यांच्या ६ लाख ९६ हजार ०९७ अर्जांपोटी रु. ३ हजार ८१६ कोटी रुपये अनुदान वग. प्रकल्प जिल्ह्यातील शेतकरी उत्पादक कंपन्या व गटांच्या ४ हजार ७०२ कृषी व्यवसाय प्रस्तावांना ५०२ कोटी रुपये अर्थसहाय्य. मृद व जलसंधारणाच्या ३ हजार ५९२ कामांवर ८१ कोटी रुपये निधी खर्च केला.

बदलत्या हवामानासाठी शेतकऱ्यांना दिलेले तंत्र :ङ शेतीशाळा अंतर्गत बीबीएफ तंत्राचा अवलंब, लिंबोळी अर्काचा वापर, कापूस पिकाकरिता 'एक गाव एक वाण', जैविक खताची बिज प्रक्रिया, फळ पीक लागवडीचे वेळी मुळाच्या परिघात सिंचन पद्धतीचा अवलंब या हवामान अनुकूल तंत्रज्ञानावर भर.

**शून्य मशागत व रुंद वाफा व सरी (बीबीएफ) तंत्रज्ञान अवलंबण्यास प्रोत्साहन :** बदलत्या हवामानामध्ये जमिनीची सुपीकता टिकविण्यासाठी व जमिनीतील कर्ब ग्रहण वाढविण्यासाठी शेतकऱ्यांनी संवर्धित शेती पद्धतीचा अवलंब करणे आवश्यक म्हणून 'शून्य मशागत' व 'बीबीएफ' या तंत्रज्ञानाचा वापर अत्यंत प्रभावीपणे करण्यात येत आहे.

**प्रकल्पाची डिजिटल अंमलबजावणी :** प्रकल्पाचे लाभ, सूक्ष्मनियोजन, शेतीशाळा , मनुष्यबळ व्यवस्थापन, कृषी हवामान सल्ला-सेवा संकेतस्थळ, फ़ार्मर ॲप द्वारे शेतकऱ्यांना कृषी-हवामान सल्ला, हवामान अनुकूल तंत्रज्ञान, बाजारभाव, गोदाम उपलब्धता विषयक माहिती मोबाईल ॲप द्वारे उपलब्ध करून दिलेली आहे.

**राष्ट्रीय स्तरावरील संस्थांशी धोरणात्मक भागीदारी :**

भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा , भारतीय तंत्रज्ञान संस्था , मुंबई; राष्ट्रीय मृदा सर्वेक्षण व भूमी उपयोगिता नियोजन संस्था, नागपूर; महाराष्ट्रातील कृषि विद्यापीठे; केंद्रीय कोरडवाहू शेती संशोधन संस्था, हैदराबाद; यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन अकादमी (यशदा) पुणे; गोखले अर्थशास्त्र संस्था पुणे; टाटा सामाजिक विज्ञान संस्था (टीआयएसएस) मुंबई या संस्थांसोबत सामंजस्य करार करण्यात आले आहे.

**प्रकल्पाद्वारे निर्माण झालेली अतिरिक्त संसाधने**

फळबाग लागवड क्षेत्र : २९ हजार २७० हेक्टर , बिजोत्पादन क्षेत्र (खरीप व रबी) : १,

लाख ५ हजार ६२० हेक्टर, शेततळी निर्मिती व बळकटीकरण अकरा हजार,पाणी साठवण क्षमता ३० हजार १८१ टी.सी.एम., सूक्ष्म सिंचनाखालील क्षेत्र : ३ लाख ५० हजार ८०० हेक्टर, संरक्षित लागवड १ हजार ५०० हेक्टर, गोडावून साठवण क्षमता २ लाख मे.टन आहे.

**प्रकल्पाचा टप्पा २ :** प्रकल्पामध्ये सद्य:स्थितीत समाविष्ट असलेल्या १६ जिल्ह्यांसह विदर्भातील उर्वरित नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली अशा एकूण २१ जिल्ह्यांमध्ये अंदाजित रु.६ हजार कोटी किंमतीचा प्रकल्पाचा टप्पा- २ राबविण्यास शासनाची तत्वत: मान्यता देण्यात आलेली आहे. यासाठी गावनिवड प्रक्रिया प्रगतीत आहे. शेतकऱ्यांना वैयक्तिक लाभामध्ये पुढील बाबींचा समावेश होतो. ठिबक सिंचन, शेडनेट हाऊस, फळबाग लागवड, रेशीम उद्योग, तुषार सिंचन, नवीन विहीर, पॉली हाऊस/ पॉली टनेल, बिजोत्पादन, वैयक्तिक शेततळे, मधुमक्षिका पालन, सामुदायिक शेततळे, खारपाण (शेततळे/ तुषार सिंचन/ पंप संच), कृषि यांत्रिकीकरण, लागवड साहित्य, शेततळे अस्तरीकरण, पाईप, पंप संच, गोड्या पाण्यातील मत्स्यपालन, हवामान अनुकुल तंत्रज्ञान शेती शाळा प्रोत्साहन, वृक्षलागवड, सेंद्रिय निविष्ठा उत्पादन, बंदिस्त शेळीपालन, रुंद वाफा व सरी प्रोत्साहन, विहिरींचे पुनर्भरण आणि परसातील कुक्कुटपालन. तसेच शेतकरी गट व कंपन्यांना पुढील बाबींचा समावेश होतो. काढणी पश्चात /प्रक्रिया केंद्र, गोदाम साठवणूक केंद्र, इतर कृषी व्यवसाय भाडे तत्वावर कृषी अवजारे सेवा केंद्रांची निर्मिती करणे आदिंचा समावेश होतो.

**- दत्तात्रय कोकरे,**
विभागीय संपर्क अधिकारी,
माहिती व जनसंपर्क
महासंचालनालय,
मंत्रालय, मुंबई-३२

# श्री गुरु गणेश तीर्थ दर्शन पदयात्रेचे सलग सतराव्या वर्षी परमेष्ठी परिवार

## कर्नाटक गजकेशरी गणेशलालजी म.सा. यांच्या ६२ व्या पुण्यतिथी निमीत्त परमेष्ठी ग्रुपतर्फे छत्रपती संभाजीनगर ते जालना ०७ फेब्रुवारी ते ०९ फेब्रुवारी २०२४ पदयात्रेचे आयोजन

छत्रपती संभाजीनगर, दि. ३० (प्रतिनिधी) – पू. कर्नाटक गजकेशरी गणेशलालजी मा.सा. यांच्या ६२ व्या पुण्यतिथी निमीत्त परमेष्ठी ग्रुप तर्फे सतराव्यादा छ .संभाजीनगर ते जालना ०७ फेब्रुवारी ते ०९ फेब्रुवारी २०२४ पदयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. ही पदयात्रा प.पु. स्व. ग्यानगंगोत्री प्रभाकरवरजी म.सा. यांच्या सुशिष्या महाराष्ट्र प्रवर्तीनी स्व. प्रकाशकवरजी म.सा. यांच्या प्रेरणेने व मार्गदर्शनाने ही पदयात्रा सलग मागील सोळा वर्षापासून निघत आहे. व हयावर्षी ०७ फेब्रुवारी २०२४ रोजी ठिक सकाळी ५.३० वाजता महावीर भवन कुंभारवाडा, औरंगपुरा चौक येथुन निघणार आहे. प्रतिवर्षी यामध्ये पुरुष, महिला, अबालवृध्द, मुले, मुली असे सर्व ५०० ते ६०० भाविकांचा सहभाग असतो.

प.पू.गणेशलालजी मा.सा. यांचे जालना येथील शिवाजी चौक येथे समाधी स्थळ आहे. अमावस्येच्या दिवशी गुरुमहाराज यांचे समाधी मरण झालेले आहे व त्याठिकाणी त्यांना समाधी देण्यात आली. म्हणून येथील समाधी दर्शनाला अमावस्येच्या दिवशी जैन धर्मात फार महत्व आहे. श्रुतमुनी मा.सा., सौरवमुनी मा.सा., गौरवमुनी मा.सा., प.पू. अक्षरमुनी मा.सा., प.पू. प्रतिभाकवरजी मा.सा., प.पू. किरण सुधाजी मा.सा. व अनेक साधू संतांच्या उपस्थितीत ०९ फेब्रुवारी २०२४ रोजी जालना येथील गणेश नगर येथील प्रांगणात तप, जप व भक्तीभावाने भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या यात्रेत सर्व यात्रेकरु व भाविकांची आहरपाणी व मुक्कामाची संपूर्ण व्यवस्था परमेष्ठी परिवार तर्फे करण्यात आलेली आहे व सोबत ॲम्ब्युलन्स व डॉक्टरांसहीत ॲम्ब्युलन्सही सोबत राहणार आहेत.

पदयात्रा ०७ फेब्रुवारी २०२४ रोजी ठिक सकाळी ५.३० वाजता महावीर भवन, आचार्य आनंद ऋषीजी मार्ग, कुंभारवाडा येथून शोभायात्राद्वारे निघाणार आहे ही पदयात्रा औरंगपुरा रोड, गुलमंडी, राजाबाजार, मोंढा नाका, जालना रोड मार्गे चिकलठाणा येथे सकाळी ८.०० वाजता पोहचेल. तेथे चहा नाष्टा झाल्यावर ठिक ९.०० वाजता करमाड कडे वाटचाल करेल, दुपारी १.०० च्या दरम्यान ही पदयात्रा करमाडला पोहचेल , करमाड श्रावकसंग तर्फे जेवण व कांही वेळ विश्रांती ची व्यवस्था करण्यात आली आहे. नंतर शेकटा कडे प्रस्थान करेल. शेकटा येथे पदयात्री मधील भाविकांची



जेवणाची, धार्मिक कार्यक्रमाची, भक्ती संगीत व मुक्कामाची व्यवस्था बदनापूर निवासी रतनचंदजी संकलेचा परिवारा तर्फे करण्यात आलेली आहे.

पदयात्रा दिनांक ०८ फेब्रुवारी २०२४ रोजी शेकटा येथून सकाळी ठिक ६ वाजता बदनापूर कडे प्रस्थान होईल, बदनापूर मध्ये बालाजी मंदिरात ओम ग्रुप तर्फे चहा नास्ता घेऊन सेलगांव मार्गे दावलवाडी येथे दुपारच्या जेवणाची व्यवस्था सेवा ग्रुप जालना तर्फे करण्यात आलेली आहे. कांही काळ विश्रांतीनंतर जालना रोड कडे रवाना होईल, जालना येथे जैन इंग्लीश स्कूल, छत्रपती संभाजीनगर रोड मध्ये पदयात्रीची भोजन आणि मुक्काम करण्यात येईल. तसेच पदयात्रेमध्ये सहभागी झालेले सर्व भाविकांचा परमेष्ठीग्रुप तर्फे सत्कार समारंभ करण्याचे आयोजन करण्यात आलेले आहे.

०७ फेब्रुवारी २०२४ रोजी गुरु गणेशलालजी महाराजांच्या जय घोषासह जैन इंग्लिश स्कूल ते जालना येथील प.पू. गणेशमलजी मा.सा. यांच्या तपोभूमि गुरु गणेश नगर (जैन गौशाला) येथे दर्शन स्थळी पोहचेल तेथील कार्यक्रमानंतर, गौ, सेवा धार्मिक विधी दुपारी १.३० वाजता जालना ते छ.संभाजीनगर पदयात्रींना येण्यासाठी बसची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच एकासना, आयबिल, उपवास करणाऱ्या भाविकांसाठी पदयात्रा दरम्यान गरम पाण्याची सुविधा देखील करण्यात आलेली आहे. व पदयात्रेमध्ये येणाऱ्या भाविकांनी किंमती वस्तू आणु नये सामायिक करण्याचे उपकरण सोबत आणावे, पुरुषांनी पांढरे वस्त्र व महिलांनी लाल, केशरी वस्त्र परिधान करावे, यावर्षी पदयात्रेकरुची संख्या सिमीत केलेली आहे. तरी सर्व भक्तांनी आपले नाव परमेष्ठी ग्रुपच्या सदस्यांकडे किंवा रतन इलेक्ट्रीकल्स, किराणा चावडी वर्धमान स्टेशनर्स, दशमेशनगर येथे नोंदवावे व बाहेर गावाहून आलेल्या भक्तांसाठी ०६ फेब्रुवारी २०२४ रोजी संध्याकाळी मुक्कामाची व्यवस्था महावीर भवन, कुंभारवाडा येथे केली आहे. तरी या पदयात्रेसाठी ०७ फेब्रुवारी २०२४ रोजी ठिक ५.०० वाजता महावीर भवन येथे जास्तीत जास्त संख्येने हजर राहून भाविकांनी आपला सहभाग नोंदवावा असे आवाहन परमेष्ठी परिवार तर्फे करण्यात आलेले आहे.

असे आवाहन प्रितेश बोरा, संतोष बोरा, पारस कात्रेला, विनोद कुंकूलोळ, पंकज संचेती, हितेंद्र चोरडिया, संदिप सुराणा, जितेंद्र चोरडिया, संतोष खिवंसरा, प्रकाश बांठिया, सत्यजीत सुराणा, प्रदिप बेदमुथा, रुपेश डोसी, संदीप काटेड, प्रविण भंडारी, प्रविण डोसी, रुपेश बोथरा, संतोष मुगदिया, जितेंद्र रेदासणी, रमेश बंब, राजेश बोरा व परमेष्टी युवा ग्रुप यांनी केले आहे.

# श्रीराम मंदिरातील सोहळ्याला सनातन संस्थेच्या आध्यात्मिक उत्तराधिकारी यांची वंदनीय उपस्थिती !

## रामलला पुन्हा राम मंदिरात प्रतिष्ठापित होणे, ही रामराज्याची नांदीच ! - श्रीसत्शक्ति ( सौ. ) बिंदा सिंगबाळ

अयोध्या - 'श्रीरामजन्मभूमीसाठी ५०० वर्षांच्या प्रदीर्घ संघर्षानंतर रामजन्मभूमी मुक्त झाली आणि आज साक्षात प्रभू श्रीरामचंद्रांच्या भव्य राम मंदिराची निर्मिती होऊन रामललाच्या प्राणप्रतिष्ठापनेच्या सोहळा आम्ही आज पहात आहोत, हा सनातन हिंदु धर्मीयांसाठी अत्यंत महत्त्वाचा दिवस आहे. देशभरातील सर्व संत-महंतांना मान देऊन आणि त्यांच्या उपस्थितीत हा सोहळा होत आहे. रामलला पुन्हा राम मंदिरात प्रतिष्ठापित होणे, ही रामराज्याची नांदी आहे', असे प्रतिपादन सनातन संस्थेच्या श्रीसत्शक्ति (सौ.) बिंदा सिंगबाळ यांनी या वेळी केले.

ऐतिहासिक आणि अभूतपूर्व अशा अयोध्येतील श्रीराम मंदिरातील मूर्तीच्या भव्य दिव्य प्राणप्रतिष्ठापना सोहळ्याला सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले यांच्या आध्यात्मिक उत्तराधिकारी श्रीसत्शक्ति (सौ.) बिंदा सिंगबाळ आणि श्रीचित्शक्ति (सौ.) अंजली गाडगीळ यांची वंदनीय उपस्थिती लाभली. श्रीरामजन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाचे सरचिटणीस श्री. चंपत राय यांनी सनातन संस्थेच्या दोन्ही आध्यात्मिक उत्तराधिकारी यांना सन्मानपूर्वक आमंत्रित केले होते.

'आसेतुहिमालयापासून हिंदसागरापर्यंत प्रत्येकाला एकात्मतेच्या बंधनात बांधणारे श्रीराम हे एक अलौकिक राष्ट्रसूत्र आहे ! प्रत्येकाच्या मनातील श्रीरामाच्या मंदिराची उभारणी हे न केवळ अधर्मावर धर्माचा विजय; परंतु त्याचसमवेत कलियुगांतर्गत सत्ययुगाच्या नवनिर्मितीची, हिंदूंच्या अलौकिक 'हिंदु राष्ट्र निर्मिती'ची, म्हणजेच स्वधर्माधिष्ठित स्वराष्ट्र, सर्वशक्तीसंपन्न, सुव्यवस्थाप्रधान, सर्वसुविधांयुक्त, सुखी, समृद्ध, सुसंस्कृत सुराज्याच्या सूर्योदयाची नांदी आहेत, असे प्रतिपादन श्रीचित्शक्ति (सौ.) अंजली गाडगीळ यांनी या प्रसंगी केले.

या वेळी दोन्ही उत्तराधिकारींनी श्रीरामाच्या मूर्तीप्रतिष्ठापना सोहळ्यात सहभागी होता आले, याबद्दल श्रीरामाच्या प्रती कोटी कोटी कृतज्ञता व्यक्त केली. श्रीसत्शक्ति (सौ.) बिंदा सिंगबाळ आणि श्रीचित्शक्ति (सौ.) अंजली गाडगीळ यांचे लखनऊ येथील विमानतळावर आगमन झाल्यावर श्रीरामजन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाचे पदाधिकारी तथा उत्तर प्रदेश शासनाच्या राजशिष्टाचार विभागाचे अधिकारी यांच्या वतीने त्यांचे स्वागत आणि सन्मान करण्यात आले.

# आणखी एका मराठी कलावंताची हिंदी चित्रपटात झेप



'फायटर ' चित्रपटातील एका दृश्यात उमेश धूत

**मराठीमध्ये** फार कमी कलावंत असे आहेत की त्यांना मराठीप्रमाणेच हिंदी मालिका तसेच चित्रपटातही भूमिका करण्याची संधी मिळते. अशा भाग्यवान कलावंतांमध्ये उमेश धूत या बुजूर्ग कलावंतांचा आवर्जून समावेश करावा लागेल. महसूल खात्यातील नोकरी सांभाळून त्यांनी आपला अभिनयाचा छंद जोपासला आहे. नाटक असो, मालिका असो की चित्रपट हाती येईल ती भूमिका स्वीकारायची आणि त्यात स्वतःला झोकून देऊन आपल्या अंगीभूत अभिनयाने त्या भूमिकेला परिपूर्ण न्याय द्यायचा या दृष्टीकोनातून त्यांची कलाक्षेत्रातील वाटचाल सुरू आहे. विशेष म्हणजे शासकिय सेवेतील निवृत्ती नंतर त्यांच्यातील अभिनयाच्या कक्षा खऱ्या अर्थाने रुंदावत चालल्या असून बिग बॅनरच्या मालिका आणि चित्रपटातील भूमिकांसाठी त्यांना मागणी येत आहे. या आठवड्यात प्रदर्शित झालेल्या हृतिक रोशन, अनिल कपूर आणि दिपिका पदुकोण यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या ' फायटर ' या चित्रपटात उमेश धूत एका वृध्द कलावंतांच्या भूमिकेत झळकले आहेत. सिद्धार्थ आनंद हे या चित्रपटाचे दिग्दर्शक आहेत. उमेश धूत यांचे फक्त फोटो पाहून दिग्दर्शक सिद्धार्थजींनी ' फायटर ' चित्रपटातील वृद्ध व्यक्तीच्या भूमिकेसाठी उमेश यांची निवड केली. यावरुन उमेश यांचे व्यक्तिमत्त्व एखाद्या भूमिकेसाठी किती चपखल मॅच होते हे लक्षात येते. ' फायटर ' या चित्रपटातील भूमिकेच्या पार्श्वभूमीवर बोलताना उमेश धूत यांनी आपल्या अभिनय कारकिर्दीची माहिती देताना सांगितले की, मला लहानपणापासून अभिनयाची आवड होती. नांदेड येथे शाळा - महाविद्यालयात शिकत असताना मी जेव्हा चित्रपट पहायचो तेंव्हा आपणही कधी ना कधी पडद्यावर झळकणार हा एक आत्मविश्वास होता. त्यादृष्टीने मी वाटचाल सुरु केली. एकांकिका, नाटकात मिळेल त्या भूमिका करायला सुरुवात केली. राज्य नाट्य स्पर्धांमधून भाग घेत बक्षिसेही मिळवली. त्यानंतर नोकरीमुळे मध्यंतरी काही काळ गॅप पडला. निवृत्तीनंतर पुणे येथे वास्तव्यास आलो आणि पुन्हा एकदा अभिनयाचा श्रीगणेशा करायचे ठरवले आणि चमत्कार घडावा त्याप्रमाणे कामे मिळत गेल्याचे उमेशजींने सांगितले.

असे म्हणतात की, आयुष्याच्या उत्तरार्धात काही जणांचे भाग्य उजळते. उमेश धूत यांच्याबाबत असेच म्हणावे लागेल. निवृत्तीनंतर त्यांच्यातील अभिनय खऱ्या अर्थाने बहरत चालला आहे. आतापर्यंत त्यांनी ' मुळशी पॅटर्न ', ' सूर सपाटा ', ' मी पण सचिन होणार ', ' देवा अंतरंगी', ' सावट ', ' ७०२ दिक्षित ' या मराठी चित्रपटात विविध भूमिका साकारल्या आहेत. ' मेरे साई ' या मालिकेत नीलकंठ ही साईभक्ताची भूमिका तर ' ज्ञानेश्वर माऊली ' या मालिकेत रत्नाजी सावकाराच्या भूमिकेत ते झळकले आहेत. याशिवाय मतदानाबाबत जनजागृती करणाऱ्या जाहिरात पटात शाहरुख खानसोबत त्यांनी काम केलेले आहे. काही वर्षांपूर्वी प्रदर्शित झालेल्या नाना पाटेकरची प्रमुख भूमिका असलेल्या ' छप्पन पार्ट २ ' या चित्रपटात उमेशजींनी एका आतंकवादीच्या वडीलांची भूमिका केलेली आहे. जॅकी श्रॉफ, मनिषा कोईराला अभिनीत ' ग्रहण ' या चित्रपटात ते न्यायमुर्तीच्या भूमिकेत झळकले आहेत. आणि आता नुकत्याच प्रदर्शित झालेल्या ' फायटर ' मध्ये उमेशजींना काम करण्याची संधी मिळाली आहे. आपल्या आतापर्यंतच्या कारकिर्दीविषयी भाष्य करताना उमेशजी म्हणतात, माझ्या आयुष्यात जे काही घडते ते सारे ईश्वरकृपेने मी फक्त निमित्तमात्र ! उमेशजींचा हा विनम्र भावच त्यांच्या यशाचे द्योतक आहे.

**- विजय न्यायाधीश**

# वैजापूर पालिका कार्यालयात हुतात्मा दिनानिमित्त हुतात्म्यांना आदरांजली



वैजापूर, दि. ३० (प्रतिनिधी) - राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचा पुण्यतिथी दिन हुतात्मा दिन म्हणून संपूर्ण देशभर पाळला जातो, या दिनी सकाळी११-००वाजता दोन मिनिटे शांत उभे राहून हुतात्म्यांना अभिवादन करतात, मंगळवार (ता,३०)रोजी येथील नगरपालिका कार्यालयात प्रशासक तथा मुख्याधिकारी भागवत बिघोत( राजपूत)यांच्या सूचनेनुसार उपमुख्याधिकारी राहुल साठे यांच्या उपस्थितीत प्रथम जेष्ठ नागरिक तथा सामाजिक कार्यकर्ते ठा. धोंडीरामसिंह राजपूत यांच्या हस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व उपमुख्याधिकारी राहुल साठे यांनी सकाळी ११ -००वाजता पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले व दोन मिनिटे स्तब्ध व शांत उभे राहून हुतात्म्यांच्या स्मृतींना आदरांजली अर्पण केली, भांडरपाल वाल्मिक शेटे, जयपालसिंह राजपूत, अरूण कुलकर्णी, अभियंता मोदाणी, अभियंता चिमटे, लेखापाल श्री मुळे, मंजिरी खैरे, श्रीमती, जोशी, विष्णू आलूले व इतर कर्मचारी उपस्थित होते.

# प्रसिद्ध अजिंठा चित्रकार विजय कुलकर्णी यांचे निधन

छत्रपती संभाजीनगर, दि. ३० (प्रतिनिधी) - येथील प्रसिद्ध अजिंठा चित्रकार विजय विष्णुपंत कुलकर्णी (वय ७३, रा. पैठण गेट) यांचे सोमवारी (दि. २९) मध्यरात्री पुणे येथे अल्पशा आजाराने निधन झाले. म्यूरल पेंटिंग, अमूर्त चित्रशैली आणि अजिंठा चित्रांसाठी ते प्रख्यात होते.



मूळचे वेरूळचे रहिवासी असलेल्या विजय कुलकर्णी यांना बालपणापासून चित्रकलेची आवड होती. सत्तरच्या दशकात त्यांनी मुंबईतील जे. जे. स्कूल ऑफ आर्टमधून चित्रकलेचे प्रशिक्षण घेतले होते. म्यूरल पेंटिंगमध्ये त्यांचा विशेष हातखंडा होता. सईद हैदर रझा, एस. व्ही. वासुदेव, चार्ल्स कोरिया, ज्ञानेश्वर नाडकर्णी, सारा अब्राहम आदी दिग्गजांनी कुलकर्णी यांना नावाजले.

मुंबईहून संभाजीनगर येथे स्थायिक झाल्यावर कुलकर्णी यांनी १९८२ मध्ये वेरूळ येथे 'रॉक आर्ट गॅलरी' सुरू केली आणि अजिंठा चित्रांसाठी आयुष्य वाहून घेतले. आज जे. जे. स्कूल, ललित कला अकादमी, एअर इंडिया, मंत्रालय, विधान भवन, राष्ट्रपती भवन, परराष्ट्र मंत्रालयासह विविध पंचतारांकित हॉटेल्समध्ये विजय कुलकर्णी यांची चित्रे लक्ष वेधून घेत आहेत. भारताबाहेरही अनेक देशांत त्यांची चित्रे गेली आहेत. आपल्या अबोल स्वभावामुळे कायम प्रसिद्धीपासून दूर राहिलेल्या विजय कुलकर्णी यांनी अखेरपर्यंत कुंचल्याची साथ मात्र सोडली नाही. विजय कुलकर्णी यांच्यावर मंगळवारी (दि. ३०) सकाळी पुण्यातच अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी सुलभा, विक्रांत आणि विराज ही दोन मुले, सुना, नात आणि वहिनी असा परिवार आहे.

# धार्मिक सप्ताह म्हणजे सार्वजिनिक आनंदोत्सव व्हायला हवेत-ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड



घनसावंगी, दि. ३० (प्रतिनिधी) - धार्मिक सप्ताह हे ख-या अर्थाने परिवर्तनाचे महत्वा चे माध्यम असल्याने धार्मिक सप्ताह हे आनंदोत्सव स्वरुपात साजरे करायला हवेत. यामुळे धार्मिक कार्याबरोबर समाजोन्नीती व आत्मोन्नतीचेही कार्य आपोआप होते, असे मत ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड यांनी व्यक्त केले.

दरवर्षीप्रमाणे यंदाही चित्रवडगाव येथे धार्मिक साप्ताहाचो आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहातील काल्याचे कीर्तन करतांना डॉ. फड यांनी कीर्तन मंडपात येणा-या सर्वांना आनंद मिळेल असे कार्यक्रम घ्यावेत असे म्हटले. सकाळी श्री ज्ञानेश्वरी पारायास बसणा-या भाविकांना नाष्टा चहा, संध्याकाळी ७ ते ९ कीर्तन व त्यानंतर सर्व भाविकांना महाप्रसादाची व्यवस्था करावी. महाप्रसादामुळे माता भगिणींना आठ दिवस रात्रीच्या स्वयंपाकातून सुटटी मिळेल. त्यांचा आनंद वाढेल. मोठया संख्येने लोक कीर्तनास येतील. मुलामुलींना मंडपातील सर्व कामे करु दयावेत. व्यक्तीगत घरी पंगती देण्यापेक्षा मंडपातच पंगती दिल्या जाव्यात. कोणालाही हा कार्यक्रम, पंगत आपली वाटली पाहीजे. सप्ताहाचे श्रेय कोणीही स्वतःकडे घेऊ नये. संयोजकापैकी कोणीही सप्ताहातील एकही रुपयाचा व्यक्तीगत लाभ घेऊ नये. नम्रतेने सर्वांचा मान सन्मान करावा. अहंकार, मीपणाला किंचितही स्थान देऊ नये. हे सर्व भगवंताचे कार्य आहे, असे समजून हे कार्य करावे.

जास्तीत जास्त तरुणांना सहभागी करुन त्यांच्याकडून कामे करुन घ्यावीत. नविन पीढी निर्माण होईल असे पहावे. टिंगल, हसतचाडपणा करणा-या तसेच अभंग सोडून बोलणा-यांना कीर्तन सेवा देऊ नये. असे सुचनात्मक कीर्तन झाले. चुकीच्या पध्दतीने वागणा-यांची एकप्रकारे कानउघाडणीच या कीर्तनातून झाली. फड यांनी यावेळी संतांचे दाखले देत श्रीमदभगवतगीता व श्री ज्ञानेश्वरीतील प्रमाणावर जास्त भर दिला होता. गावक-यांना हे कीर्तन खूप आवडले, असे संयोजकांनी बोलून दाखवले. पुढच्या वर्षीचीही फड यांनी येथे कीर्तन करावे असेही लोक म्हणाले. फड यांच्या सुचना योग्य असल्याने आम्ही या सुचना अंमलात आणू असे संयोजक म्हणाले. यावेळी फड यांनी विदयार्थ्यांना अभ्यासाच्या अनुषंगानेही मार्गदर्शन केले. कीर्तनासाठी मोठया संख्येने भाविक उपस्थित होते.

# अग्रसेन विद्या मंदिर शाळेत '७५ वा प्रजासत्ताक दिन' उत्साहात साजरा

छत्रपती संभाजीनगर, दि. ३० (प्रतिनिधी) - पैठण रोड येथील अग्रसेन विद्या मंदिर शाळेत स्वातंत्र्य, समता, बंधुता व ऐक्य यांना अधोरेखित करणारा ७५ वा प्रजासत्ताक दिन उत्साह व जल्लोषात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरूवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर, माता सरस्वती व छत्रपती महाराजा अग्रसेन यांच्या प्रतिमापूजनानंतर शाळेचे विश्वस्त व कार्यक्रमाचे अध्यक्ष केशवजी लीला व शाळा समितीचे अध्यक्ष राजकुमारजी टिबडेवाला यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. एनसीसी कॅडेटनी शिस्तबद्ध संचलन करून मान्यवरांना मानवंदना दिली. यासाठी विद्यार्थ्यांना शाळेचे असोसिएट एनसीसी ऑफिसर सौरभ जोशी यांचे मार्गदर्शन लाभले. संगीत शिक्षक नेहा नेरळकर व सागर नागापुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी झेंडा गीताद्वारे राष्ट्रध्वजास स्वरबद्ध मानवंदना दिली.

प्रजासत्ताक दिनानिमित्त शाळेमध्ये विविध रंगारंग कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. भरतनाट्यम व हिपहॉप या नृत्याविष्कारात प्राचीन व आधुनिकतेची सरमिसळ करत इयत्ता ७ वी व ८ वीच्या विद्यार्थ्यांनी प्रेक्षकांचे मनोरंजन केले. त्यानंतर समुह गीताद्वारे प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करण्यात आले. भारतीय वैविध्य तसेच विज्ञान-तंत्रज्ञान यांची सांगड घालत शाळेच्या इयत्ता १ ली ते ८ वी च्या विद्यार्थ्यांनी आरोग्यदायक सवयी, प्रदूषण व उपाययोजना, भारतीय मंदिरे-एक समृद्ध वारसा, वसुधैव कुटुंबकम् व भारतीय शिक्षण पद्धती या शीर्षकांतर्गत सजीव देखाव्याद्वारे आलेल्या प्रमुख पाहुण्यांचे, पालकांचे मनोरंजन तसेच उद्बोधन केले. क्रीडा शिक्षक मयुर बोढरे यांच्या मार्गदर्शनांतर्गत शरीर व मन यांचे संतुलन साधत शारीरिक कवायतीद्वारे विविध मानवी मनोरे उभारून प्रेक्षकांची वाहवा मिळविली. शाळेच्या शिक्षिका उर्मिला पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली इयत्ता ५ वी ते ९ वी च्या विद्यार्थ्यांनी रोप मल्लखांबच्या चित्त थरारक प्रात्यक्षिकाद्वारे दर्शकांना टाळ्या वाजवण्यास भाग पाडले. प्रसंगी शाळेतील सर्व विभागातील विज्ञान विषय शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली इयत्ता १ ली ते १० वी च्या विद्यार्थ्यांद्वारा विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले तसेच शाळेमध्ये लायन्स क्लबद्वारे रक्तदान शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले यामध्ये पालक व शिक्षकांनी आपला उत्स्फूर्त सहभाग नोंदवून सामाजिक बांधिलकी जपली. कार्यक्रमाचे औचित्य साधून शाळेतील सर्व विभागातील विषय शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार तसेच शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये विविध शाळेय कार्यक्रमांमध्ये कार्य करणाऱ्या कला, रांगोळी, पूजा विभागातील शिक्षकांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथींनी विद्यार्थ्यांशी व पालकांशी संवाद साधतांना विकसित भारत घडवतांना आपल्या जबाबदाऱ्यांशी परिचित करून दिले. प्रसंगी व्यासपीठावर शाळेचे विश्वस्त केशवजी लीला, शाळा समितीचे विद्यमान अध्यक्ष राजकुमारजी टिबडेवाला, उपाध्यक्ष राजेशजी भारुका, सचिव निधिजी अग्रवाल, कोषाध्यक्ष पंकजजी अग्रवाल व सन्माननीय सदस्यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या शिस्तबद्ध आयोजनासाठी शाळेचे प्राचार्य संतोष कुमार करवा व उपप्राचार्या मयुरी लोगलवार, अधीक्षक अजय सोनुने यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या संपन्नतेसाठी सर्व विभागांचे विभाग प्रमुख, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अविरत परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन समृद्धी सूर्यवंशी व धनश्री भाले यांनी केले. नेहा नेरळकर यांच्या राष्ट्रीय गीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# खुल्या न्यायालयात सुनावणी घ्या; टिकणारे आरक्षण मिळावे म्हणून अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांची सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल

नवी दिल्ली, दि. ३० (वृत्तसंस्था) - टिकणारे आरक्षण मिळावे म्हणून जेष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांनी अधिकच्या भक्कम पुराव्यासह सर्वोच्च न्यायालय दिल्ली येथे याचिका दाखल केली आहे.सर्वोच्चा न्यायालयाने या पुर्वी मराठा आरक्षणावर निकाल देताना अनेक महत्वाच्या बाबी विवीध न्याय निवाडे विचारत घेतले नव्हते म्हणून मराठा समाज न्याया पासुन वंचीत राहीला होता.

अनेक महत्वाचे न्याय निवाडे ज्यात पाचं-सात -नऊ-अकरा एवढेच काय तर अकरा आणि तेरा न्यायाधीशांच्या घटना पिठाने दिलेल्या महत्वपूर्ण निकालांचे अनेक पुरावे, न्याय निवाडे जेष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांनी दाखल केले आहेत. मराठा समाजाला टिकणारे आरक्षण मिळण्यासाठी न्यायालयीन कायदेशीर व घटनात्मक लढा देण्याचा निर्धार देखील त्यांनी व्यक्त केला आहे.

खुल्या न्यायालयात सुनावणी शिवाय न्याय मिळणार नाहीअसे स्पष्ट मत आरक्षणाचे जेष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांचे प्रतिपादन केले आहे. क्युरेटिव्ह पीटीशनची सुनावणी खुल्या न्यायालयात झाली तरच मराठा समाजाला न्याय मिळेल, मराठा समाजाचे रद्द केलेले आरक्षण परत मिळविण्यासाठी या पुर्वी महाराष्ट्र शासनाने सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेली क्युरेटिव्ह याचिका सर्वोच्च न्यायालयाने स्वीकारायची किंवा कसे यावर दिनांक ६डिसेंबर रोजी होणारा निर्णय२४ जानेवारी २०२४ रोजी होण्याची शक्यता होती. त्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने क्यूरेटिव्ह पिटिशन दाखल केली आहे.ती स्वीकारायची किंवा फेटाळायची याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयात होणे बाकी आहे.

मराठा आरक्षणा बाबत असलेली 'क्युरेटिव्ह पिटिशन ' ही राज्य शासनाला सर्वोच्च न्यायालयात अंतीम संधी आहे. ०६ डिसेंबर २०२३ ला ' इन चेंबर 'मधील सुनावणीत पक्षकार किंवा वकील कायद्या प्रमाणे उपस्थित राहू शकत नव्हते. त्यामुळे अधिकचे न्यायनिवाडे, विविध केस लॉ यांची यथा योग्य मांडणी करता यावी म्हणून मराठा आरक्षण क्युरेटिव्ह पीटीशनची सुनावणी खुल्या न्यायालयात व्हावी या साठी राज्य शासनास प्रचंड मेहनत घ्यावी लागणार असुन त्यात कसुर झाल्यास क्युरेटिव्ह पीटीशन रद्द बातल ठरू शकणारी बाब पुढे येऊ शकेल असे ते म्हणाले.

पुढे सविस्तर बोलतांना जेष्ठ अभ्यासक जेष्ठ राजेंद्र दाते पाटील यांनी सांगितले की, सर्वोच्च न्यायालयातील घटनापीठाने नोंदविलेल्या निरीक्षणा प्रमाणे नव्या आयोगच्या वतीने मराठा समाजाचे सामाजिक व शैक्षणिक मागासपण असल्याची बाब शिफारशी सह प्राप्त झाल्यास राज्य शासनास आरक्षण देणे निवडणुकींच्या आचार संहीते पूर्वीच शक्य करावयाचे कार्य जोमाने हाती घेण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केल्यास तो सर्व 'क्वांटीफेबल डाटा' संकलित करणे सोपे जाणार असुन खुप पूर्वीच आम्ही प्रत्यक्षपणे मुख्यमंत्र्यांना सादरी करण केलेले असुन राज्य शासनास तशी लेखी माहिती सुद्धा दिलेली असुन त्या अनुषांगाचे सर्व्हेक्षणासाठी आवश्यक सॉफ्टवेअर ॲप्लिकेशन, शास्त्र शुध्द वापर या प्रशिक्षित कर्मचारी वर्गास इंटरनेट कनेक्शन उपलब्ध नसताना देखील आप आपल्या मोबाईलचा वापर करण्याचे विकसित असेलल्या तंत्र ज्ञानाचा वापर करण्याचे ॲप्लिकेशन देऊन वापर करता आला पाहीजे.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो.:९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# छत्रपती संभाजीनगरात मलकापूर, आदर्श, अजिंठा बँकेच्या ठेवीदारांचे आक्रमक आंदोलन

## ठेवीदारांसह खासदार जलील घुसले विभागीय आयुक्तालयात; पोलिसांकडून अश्रुधुराचा वापर



छत्रपती संभाजीनगर दि.३० (प्रतिनिधी)- शहरातील आदर्श, मलकापूर आणि अजिंठा अर्बन बँकेत अनेकांच्या ठेवी अडकल्या आहेत. पैसे परत मिळावे यासाठी शेकडो ठेवीदारांच्या सोबत आज सकाळी खासदार इम्तियाज जलील यांनी विभागीय आयुक्तालय येथे आंदोलन सुरू केले. दुपारी ३ वाजेदरम्यान आयुक्तांना निवेदन देण्यावरून आंदोलक आणि पोलिसांमध्ये वाद झाल्याने आंदोलक आक्रमक झाले. यातच आंदोलक आयुक्तालयाच्या गेटवर अडून राहिल्याने एकच गोंधळ उडाला. परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यासाठी पोलिसांनी अश्रुधुराच्या नळकांड्या देखील फोडल्या.

खा. जलील यांच्या नेतृत्वाखालील आदर्श सहकारी पतसंस्थेता, अजिंठा आणि मलकापूर बँकतील शेकडो ठेवीदारांनी आज सकाळी विभागीय आयुक्तालय परिसरात आंदोलन सुरू केले. आंदोलकांची संख्या वाढल्याने दुपारी विभागीय आयुक्तालयासमोरील रस्ता अडवला. तसेच निवेदन देण्यासाठी आयुक्तालयात प्रवेश घेण्यास निघाले. यावेळी काही आंदोलक बंद गेटवरून चढून आत प्रवेश करू लागले. परंतु, गेटवरच रोखण्याच्या प्रयत्न केल्याने पोलिस आणि आंदोलकांमध्ये वाद झाला. आंदोलक आक्रमक झाल्याने पोलिसांनी जमाव पांगविण्यासाठी अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्या. यामुळे खासदार जलील देखील आक्रमक झाले. सध्या सर्व आंदोलक आयुक्तालय परिसरात ठिय्या देत आहेत. पोलिसांचे दंगा कापू पथक आयुक्तालयात दाखल झाले असून परिस्थिती नियंत्रणात आहे.

दरम्यान जलील यांनी ठेवीदारांना मार्गदर्शन केले. त्यानंतर मोर्चा विभागीय आयुक्तांकडे वळवला. परंतू त्यांना गेटवरच पोलिसांनी अडवल्याने त्या ठिकाणी गोंधळ उडाला. आंदोलक आक्रमक झाल्याने त्यांनी थेट बॅरिकेट्स तोडून व गेटवरून चढून विभागीय आयुक्तालयात प्रवेश केला. यात खासदार इम्तियाज जलील देखील गेटवरून चढून आतमध्ये शिरले. यावेळी काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. पोलिस व आंदोलकांमध्ये वाद निर्माण झाला..

पोलीस आयुक्त, डी.डी आर यांना बोलवा, एसी कॅबिन सोडून बाहेर या, नाही तर सर्व लोक आत येतील. अश्रुधुराचे नळकांडे फोडण्याचा आदेश कुणी दिला? हे गुंड प्रवृत्तीचे लोक आहेत काय? वयोवृद्ध, महिला यांचा विचार सुध्दा केला नाही. दंगा करण्यासाठीं ते आले नव्हते. लिखित आश्वासन देत नाही तोपर्यंत आम्ही हलणार नाही आणि तुम्हालाही बाहेर पडू देणार नाही. गरज पडली तर लाठीकाठी नाही गोळ्या खायला देखील आम्ही तयार आहोत.सरकार वरचा विश्वास उडाला त्यामुळे लेखी आश्वासन हवे. मंत्री मंडळ बैठकी वेळी दोन मंत्र्यांनी दीड महिन्यात पैसे देण्याचे आश्वासन दिले होते. परंतु अजून काहीच झाल नाहीं. असे खासदार इम्तियाज जलिल म्हणाले.

# ॲल्युमिनियम इंगट, टर्निंग चोरणारे जेरबंद; गुन्हे शाखेची कारवाई

## अडीच लाखांचा मुद्देमाल जप्त

छत्रपती संभाजीनगर दि.३० (प्रतिनिधी)- जोगेश्वरीतील मेटल कंपनीतून चोरी केलेले दीड लाखांचे ॲल्युमिनियम इंगट व ॲल्युमिनियम टर्निंग तसेच एक लाखांची रिक्षा असा एकूण अडीच लाखांचा मुद्देमाल गुन्हे शाखेने जप्त केला आहे. या चोरीप्रकरणी तीन चोरट्यांना गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली आहे.

जोगेश्वरीतील न्यू आंबेडकरनगरातील एका व्यक्तीकडे चोरीचो ॲल्युमिनियमचे इंगट व टर्निंग असल्याची माहिति गुन्हे शाखेला मिळाली होती. त्याआधारे हबीब अबुद शेख (५२) याला लोडिंग रिक्षासह (एमएच २० ईएफ ९१०६) ताब्यात घेतले. रिक्षात १ लाख ४२ हजार ५०० रुपये किमतीचे ॲल्युमिनियम इंगट व ॲल्युमिनियम टर्निंग आढळले. हे साहित्य नसीर कादर शेख याने दिल्याची माहिती हबीबने दिली.

पोलीसांनी नसीर शेख याला ताब्यात घेतले असता, जागेश्वरीतील त्रऋचा कंपनीजवळील एका मेटल कंपनीतून २२ जानेवारी रोजी रात्री समीर, शाहरूख आणि फिरोज (सर्व रा. जोगेश्वरी) तसेच शाहरूखच्या ओळखीचे बिडकीन येथील तिघे जण आदींनी मिळून हि चोरी केल्याचे नसीरने पोलीसांना सांगितले. त्याच्या माहितीवरून पोलीसांनी फिरोज शेख छोटू मियाँ याला ताब्यात घेतले.

या चोरीप्रकरणी एम वाळूज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. तिन्ही आरोपींना एम वाळूज पोलीस ठाण्याच्या ताब्यात दिले. हि कामगिरी गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप गुरमे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक विनायक शेळके, हवालदार संजय राजपूत, संजय गावंडे, गजानन मेटे, ज्ञानेश्वर पवार, विलास कोतकर, अंमलदार कैलास काकड, रामदास गव्हाणे, विलास मुठे, नितीन देशमुख, संदीप सानप, दिपाली सोनवणे आदींच्या पथकाने केली.

# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

(दूरध्वनी क्र.) ०२४०-२३३३५३६-४० (पी.बी.एक्स.)
२३३१२८१, २३३१२८३
फॅक्स नं.०२४०-२३३१२१३

जा.क्र./मनपा/उआ (२)/७०/२०२४ — दिनांक :- ३०/०१/२०२४

**वाचा :-** ०१. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे नियम-१२८ व परिशिष्ठमधील प्रकरण-८ कराधान नियम
०२. जप्त केलेल्या स्थावर जंगल मालमत्ता विक्रीचे नियम-२०२१

## जप्त केलेल्या मालमत्तेच्या विक्रीसाठीची जाहीर लिलाव नोटीस

ज्या अर्थी वारंवार सूचित करूनही खालील विवरणामधील मालमत्ताधारकांनी मालमत्ता कराची थकीत रक्कम भरलेली नाही. त्याबद्दल त्यांना देयक तसेच वारंवार सूचना देण्यात आलेल्या आहेत.

तसेच ज्या अर्थी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या परिशिष्ठ-ड मधील प्रकरण-८ कराधान नियम-४२, पोट नियम (१) अंतर्गत कर निर्धारक व संकलक यांनी खालील विवरणाप्रमाणे 'नमुना-ह' मधील अधिपत्र आदेशाप्रमाणे नमूद केलेल्या व्यक्तीची मालमत्ता ही थकीत रकमेच्या वसूलीसाठी जप्त केली आहे.

ज्या अर्थी आता अशा जाहीर प्रगटनाद्वारे नोटीस देण्यात येते की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम-१२८, पोटकलम (४) च्या तरतुदीच्या अधिन राहुन छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे संबंधित झोन अधिकारी ती मालमत्ता लिलावाने विक्री करणार आहेत. त्याअर्थी नोटीस मध्ये नमूद केल्याप्रमाणे तामील तारखेपासून २१ दिवसात थकीत रक्कम भरणा न केल्यास संबंधित मालमत्ता जाहीर लिलावाद्वारे विक्री केली जाईल. विक्रीसाठी निश्चित केल्या जाणाऱ्या अटी अनुसूचिनुसार असतील. खालील नमूद सर्व संबंधितांना झोन अधिकारी मार्फत उक्त नोटीस बजावण्यात आली असून याद्वारे सर्व संबंधितास जाहीर करण्यात येत आहे. लिलावाची तारीख व वेळ, स्थळ नोटीस मध्ये नमूद केल्याप्रमाणे राहील.

**स्वाक्षरीत/-**
**उप आयुक्त-२**
**छत्रपती संभाजीनगर, महानगरपालिका**

| अ. क्र. | झोन क्र. | मालमत्ताधारकांचे नांव | पत्ता | मालमत्ता क्र | एकूण थकीत रक्कम | कनिवसं याचे जप्ती बाबत आदेश दि. | फॉर्म नं.४ दिल्याचा क्र व दिनांक | लिलावाची तारीख | लिलावाचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 1 | रेशमाजी शेख उमर-. | मिटमिटा -, छत्रपती संभाजीनगर - 431001 | A0018576 | 134920 | 07.12.2023 | 17.01.2024 | 07.02.2024 | मनपा मुख्य कार्यालय प्रशासकीय ईमारत टप्पा क्र.३ |
| 2 | 1 | १. शेख रियाज शेख सलिमोद्दीन<br>२. शेख खदीरोद्दीन शेख सलिमोद्दीन<br>३. शेख अजहरोद्दीन शेख नजीराद्दीन | Plot No.27&28, Gut No.92/P, सवेरा हॉलजवळ मिटमिटा, छत्रपती संभाजीनगर | A04032979 | 190783 | 07.12.2023 | 17.01.2024 | 07.02.2024 | ...do... |
| 3 | 1 | सह. सचिव नवचैतन्य क्रिडा सेवा भावी | Gut No. 107, मिटमिटा, -, छत्रपती संभाजीनगर | A0038173 | 182072 | 07.12.2023 | 17.01.2024 | 07.02.2024 | ...do... |
| 4 | 1 | आयान एजुकेशन ॲण्ड वेलफेअर-खान नूर खान | Gut No.113/P, मिटमिटा, -, छत्रपती संभाजीनगर | A0040448 | 440302 | 07.12.2023 | 17.01.2024 | 07.02.2024 | ...do... |
| 5 | 1 | आर बी नागपाल | मिटमिटा, 1-1-1290, -, छत्रपती संभाजीनगर - 431001 | A0009288 | 998553 | 07.12.2023 | 17.01.2024 | 07.02.2024 | ...do... |
| 6 | 1 | ताराबाई-शर्मा | Gut No.302, फौजी ढाब्याच्या बाजुला मिटमिटा, -, छत्रपती संभाजीनगर | A0042742 | 476928 | 07.12.2023 | 17.01.2024 | 07.02.2024 | ...do... |
| 7 | 1 | पुष्पा-नलावडे | Plot No.15, Gut No.271/P, दि.न्यु. मराठवाडा स.गृह., नि.संस्था, मिटमिटा, छत्रपती संभाजीनगर - 431001 | A0018465 | 131109 | 07.12.2023 | 17.01.2024 | 07.02.2024 | ...do... |
| 8 | 1 | जुगलकिशोर छगनलाल तापडीया -. | मिटमिटा 1-1-265, -, छत्रपती संभाजीनगर - 431001 | A0024546 | 809778 | 07.12.2023 | 17.01.2024 | 07.02.2024 | ...do... |
| 9 | 1 | महमंद याहीया-अनिल विश्वनाथ सोनवणे व प्रफुल्लचंदजी ब्रम्हेचा | Gut No. 154 मिटमिटा | A0043769 | 232529 | 07.12.2023 | 17.01.2024 | 07.02.2024 | ...do... |
| 10 | 1 | आसाराम भाऊराव मुळे, | मिटमिटा, मुंबई मेन रोड, -, छत्रपती संभाजीनगर -431001 | A0025516 | 124210 | 07.12.2023 | 17.01.2024 | 07.02.2024 | ...do... |
| 11 | 1 | दशरथ गिरजाराम मुळे-. | मिटमिटा, मुंबई मेन रोड, -, छत्रपती संभाजीनगर -431001 | A0025513 | 296687 | 07.12.2023 | 17.01.2024 | 07.02.2024 | ...do... |
| 12 | 1 | लक्ष्मण बाजीराव बनकर.. | पडेगाव, 267, -, छत्रपती संभाजीनगर - 431001 | A0018586 | 276544 | 07.12.2023 | 17.01.2024 | 07.02.2024 | ...do... |
| 13 | 1 | श्रीराम जोगदंड पाटील-. | G.No.147, 'माऊली रेस्टॉरंट', नाशिक रोड, मिटमिटा, भ्र.क्र.9423456909, छत्रपती संभाजीनगर | A0031207 | 1366806 | 07.12.2023 | 17.01.2024 | 07.02.2024 | ...do... |
| 14 | 1 | Midos Hill New Homes Tarfe R.B. Nagpal B.S.N.L-. | मिटमिटा नागपाल सिटी बी एस एन एल -, छत्रपती संभाजीनगर - 431001 | A0021253 | 358773 | 07.12.2023 | 17.01.2024 | 07.02.2024 | ...do... |
| 15 | 1 | राना साहेबराव मन्नुलाल - | पडेगाव, 231, -, छत्रपती संभाजीनगर - 431001 | A0008794 | 173306 | 07.12.2023 | 17.01.2024 | 07.02.2024 | ...do... |
| 16 | 1 | एन आर खंडागळे -. | भिमनगर, भावसिंगपुरा, 5-12-3/p, -, छत्रपती संभाजीनगर - 431001 | A0015663 | 115903 | 06.11.2023 | 16.01.2024 | 07.02.2024 | ...do... |
| 17 | 1 | बी ए म्हस्के -. | किलेअर्क 2-11-50, -, छत्रपती संभाजीनगर - 431001 | A0037507 | 239768 | 17.10.2023 | 15.01.2024 | 05.02.2024 | ...do... |
| 18 | 1 | लोखंडे बबन मोतीराम -. | किले अर्क Plot no. 13, -, छत्रपती संभाजीनगर - 431001 | A0037480 | 115487 | 17.10.2023 | 15.01.2024 | 05.02.2024 | ...do... |
| 19 | 1 | ताकवाले लिलाबाई रतन-. | किले अर्क Plot no.14, -, छत्रपती संभाजीनगर - 431001 | A0037481 | 102767 | 17.10.2023 | 15.01.2024 | 05.02.2024 | ...do... |
| 20 | 1 | हिवराळे गणेश मारोती -. | किले अर्क Plot no.22, -, छत्रपती संभाजीनगर - 431001 | A0037470 | 101105 | 17.10.2023 | 15.01.2024 | 05.02.2024 | ...do... |
| 21 | 1 | म्हस्के सांडू -. | किले अर्क Plot no.20, -, छत्रपती संभाजीनगर - 431001 | A0037472 | 113485 | 17.10.2023 | 15.01.2024 | 05.02.2024 | ...do... |
| 22 | 1 | सौ. मिरा मच्छींद्र शेळके-. | Plot No.19/P, S.No.45/2, पहाडसिंगपुरा, -, छत्रपती संभाजीनगर | A0024642 | 143335 | 20.10.2023 | 17.01.2024 | 09.02.2024 | ...do... |
| 23 | 1 | महानंदा शरदरराव पवार-. | Fno I संजय रेसीडेन्सी बेगमपुरा, -, छत्रपती संभाजीनगर - 431001 | A0002435 | 120050 | 20.10.2023 | 17.01.2024 | 09.02.2024 | ...do... |
| 24 | 1 | रामगोपाल-मिनियार | Shop No.5, CTS No.1244, न्यु प्रिमियर अपार्टमेंट बेगमपुरा, छत्रपती संभाजीनगर | A0033758 | 158479 | 20.10.2023 | 17.01.2024 | 09.02.2024 | ...do... |
| 25 | 1 | बिडवे सुंदरराव किसनराव-. | बेगमपुरा 1-1-17/p, -, छत्रपती संभाजीनगर - 431001 | A0002395 | 159698 | 20.10.2023 | 17.01.2024 | 09.02.2024 | ...do... |
| 26 | 1 | लाहनू पुंजाजी चिणोळे -. | बेगमपुरा, 1-2-79, -, छत्रपती संभाजीनगर - 431001 | A0000321 | 226923 | 20.10.2023 | 17.01.2024 | 09.02.2024 | ...do... |
| 27 | 1 | बयोवाई हेकचंद शिवनये -. | बेगमपुरा 1-8-79, -, छत्रपती संभाजीनगर - 431001 | A0000673 | 141737 | 20.10.2023 | 17.01.2024 | 09.02.2024 | ...do... |
| 28 | 1 | पुंडलिक दादाराव शिंदे-, | बेगमपुरा, 1-7-54, -, छत्रपती संभाजीनगर - 431001 | A0000823 | 176395 | 20.10.2023 | 17.01.2024 | 09.02.2024 | ...do... |
| 29 | 1 | शंभु मोहनराव पडोरे-. | बेगमपुरा, 1-3-5/p, -, छत्रपती संभाजीनगर - 431001 | A0000346 | 149536 | 20.10.2023 | 17.01.2024 | 09.02.2024 | ...do... |
| 30 | 1 | १. कौलसबाई श्रीराम बनकर<br>२. अरुण श्रीराम बनकर-. | बेगमपुरा, 1-3-6, -, छत्रपती संभाजीनगर - 431001 | A0034648 | 248823 | 20.10.2023 | 17.01.2024 | 09.02.2024 | ...do... |
| 31 | 1 | चंद्रभाई रामराव झळके, | बेगमपुरा, 1-3-83, -, छत्रपती संभाजीनगर - 431001 | A0000446 | 152784 | 20.10.2023 | 17.01.2024 | 09.02.2024 | ...do... |
| 32 | 1 | लोखंडे प्रमोद केशव-. | भावसिंगपुरा 9,1, -, छत्रपती संभाजीनगर - 431001 | A0018277 | 206706 | 22.11.2023 | 17.01.2024 | 08.02.2024 | ...do... |
| 33 | 1 | सतीष कुमार -मोरे | भिमनगर -, छत्रपती संभाजीनगर - 431001 | A0025555 | 182693 | 22.11.2023 | 17.01.2024 | 08.02.2024 | ...do... |
| 34 | 1 | सौ. वर्षा विक्रम गजहंस-. | Plot No.15, S.No.62/2, गणेश मंदीर जवळ, प्रभातनग, भावसिंगपुरा, छत्रपती संभाजीनगर | A0028861 | 120212 | 22.11.2023 | 17.01.2024 | 08.02.2024 | ...do... |
| 35 | 1 | लग्गड सदाशिव मारुती-. | भावसिंगपुरा -, छत्रपती संभाजीनगर - 431001 | A0018291 | 210842 | 22.11.2023 | 17.01.2024 | 08.02.2024 | ...do... |
| 36 | 1 | लग्गड रामु मारोती-. | भावसिंगपुरा -, छत्रपती संभाजीनगर - 431001 | A0018275 | 217969 | 22.11.2023 | 17.01.2024 | 08.02.2024 | ...do... |
| 37 | 1 | पाराजी लोखंडे, लोखंडे | भिमनगर, भावसिंगपुरा दु.नं.1,2,4 -, छत्रपती संभाजीनगर - 431001 | A0025815 | 265601 | 22.11.2023 | 17.01.2024 | 08.02.2024 | ...do... |
| 38 | 1 | लग्गड भानुदास मारोती-. | भावसिंगपुरा -, छत्रपती संभाजीनगर - 431001 | A0018273 | 183863 | 22.11.2023 | 17.01.2024 | 08.02.2024 | ...do... |
| 39 | 1 | हरिष चंदन चावडा-. | भडकल गेट -, छत्रपती संभाजीनगर - 431001 | A0007009 | 163168 | 04.12.2023 | 17.01.2024 | 07.02.2024 | ...do... |
| 40 | 1 | कमलाबाई जगन्नाथ उदावंत. | भडकल गेट 5-5-30/p,, -, छत्रपती संभाजीनगर - 431001 | A0006901 | 202585 | 04.12.2023 | 17.01.2024 | 07.02.2024 | ...do... |
| 41 | 1 | दगडुजी रखमाजी शिंदे | भडकल गेट 5-5-5, -, छत्रपती संभाजीनगर - 431001 | A0006878 | 168923 | 04.12.2023 | 17.01.2024 | 07.02.2024 | ...do... |
| 42 | 1 | भारतसिंग टिकासिंग राजपूत | भडकल गेट 5-5-66, -, छत्रपती संभाजीनगर - 431001 | A0006949 | 170214 | 04.12.2023 | 17.01.2024 | 07.02.2024 | ...do... |
| 43 | 1 | डॉ. शोहेन शेख याकुब | ज्युबली पार्क, मोगल प्लाझा, सुप्रीम डेंटल हॉस्पिटल, छत्रपती संभाजीनगर | A0025769 | 552952 | 20.12.2023 | 16.01.2024 | 08.02.2024 | ...do... |
| 44 | 1 | जिया उल उलुम गर्ल्स हायस्कुल | बुढीलेन 1-15-30, -, छत्रपती संभाजीनगर | A0021324 | 170845 | 20.12.2023 | 16.01.2024 | 08.02.2024 | ...do... |
| 45 | 1 | नंदीनी संजय इंगळे | भडकल गेट 1-19-501, -, छत्रपती संभाजीनगर | A0024528 | 115196 | 17.10.2023 | 15.01.2024 | 05.02.2024 | ...do... |
| 46 | 1 | मैमुना बेगम W/O सय्यद हुस्सामुद्दीन | H No.1/19/55. S No.3296/5 (जबीस् इस्माईल हॉटेल) जुनाबाजार बुढीलाईन छत्रपती संभाजीनगर | A0013099 | 255048 | 20.12.2023 | 16.01.2024 | 07.02.2024 | ...do... |
| 47 | 1 | मसरत अली महेबूब अली | जुनाबाजार SHOP.2, -, छत्रपती संभाजीनगर | A0021995 | 124735 | 20.12.2023 | 16.01.2024 | 07.02.2024 | ...do... |
| 48 | 1 | कडुबा सांडु मुळे | श्रीराम अलंकार, मुंबई रोड, मिटमिटा, -, छत्रपती संभाजीनगर | A0025802 | 139720 | 07.12.2023 | 17.01.2024 | 07.02.2024 | ...do... |
| 49 | 1 | मोईनखान पि. उमीद खान | मिटमिटा 102, -, छत्रपती संभाजीनगर | A0018600 | 118122 | 07.12.2023 | 17.01.2024 | 07.02.2024 | ...do... |
| 50 | 1 | कुशहेमा पिता अबु आसीम आझामी | मिटमिटा, छत्रपती संभाजीनगर | A0017009 | 798795 | 07.12.2023 | 17.01.2024 | 07.02.2024 | ...do... |
| 51 | 1 | ताराबाई केशव बनकर | आशानगर 11, -, छत्रपती संभाजीनगर | A0016906 | 124275 | 07.12.2023 | 17.01.2024 | 07.02.2024 | ...do... |
| 52 | 1 | अफसाना बेगम मोहमद अब्दुल रहेमान कुरैशी | Plot No.125, Gut No.90/92, नाजीया पार्क मिटमिटा | A0034520 | 173881 | 07.12.2023 | 17.01.2024 | 07.02.2024 | ...do... |
| 53 | 1 | जफर खान अय्युब खान व युसूफ खान अय्युब खान | Plot No.2, 3, Gut No. 101, मिटमिटा, मुंबई रोड, -, छत्रपती संभाजीनगर | A0035698 | 173822 | 07.12.2023 | 17.01.2024 | 07.02.2024 | ...do... |
| 54 | 1 | चंद्रभान एकनाथ लोखंडे | जुना भावसिंगपुरा, विठ्ठल रुख्मणी मंदिरा जवळ, Z1/16/780, -, छत्रपती संभाजीनगर | A0004998 | 166364 | 22.11.2023 | 17.01.2024 | 08.02.2024 | ...do... |
| 55 | 1 | पंडीत लोखंडे | भावसिंगपुरा 5, -, छत्रपती संभाजीनगर | A0018341 | 139506 | 22.11.2023 | 17.01.2024 | 08.02.2024 | ...do... |
| 56 | 1 | विठ्ठल प्रभाकर लोखंडे | भावसिंगपुरा -, छत्रपती संभाजीनगर | A0025615 | 569919 | 22.11.2023 | 17.01.2024 | 08.02.2024 | ...do... |
| 57 | 1 | एकनाथ लोखंडे NPO मुरलीधर एकनाथ लोखंडे | (1-16-108), 5-16-426, संभाजी चौक, भावसिंगपुरा छत्रपती संभाजीनगर | A0018814 | 239777 | 22.11.2023 | 17.01.2024 | 08.02.2024 | ...do... |
| 58 | 1 | खंडेराव लोखंडे | भावसिंगपुरा -, छत्रपती संभाजीनगर | A0025609 | 134884 | 22.11.2023 | 17.01.2024 | 08.02.2024 | ...do... |
| 59 | 1 | लोखंडे शोभा ज्ञानदेव | भावसिंगपुरा 51,52, -, छत्रपती संभाजीनगर | A0018300 | 213157 | 22.11.2023 | 17.01.2024 | 08.02.2024 | ...do... |
| 60 | 1 | शैलेंद्र मोहनराव तायडे | भिमनगर -, छत्रपती संभाजीनगर | A0025642 | 145195 | 22.11.2023 | 17.01.2024 | 08.02.2024 | ...do... |
| 61 | 1 | मैनाबाई मोहन तायडे | भावसिंगपुरा p.no.5, -, छत्रपती संभाजीनगर | A0015313 | 125941 | 22.11.2023 | 17.01.2024 | 08.02.2024 | ...do... |
| 62 | 1 | सौ. कांताबाई राधाकिशन गजीले | Plot No.62/A, फिरदोस गार्डन पडेगांव , Z1/14/657, छत्रपती संभाजीनगर | A0030866 | 146348 | 22.11.2023 | 18.01.2024 | 08.02.2024 | ...do... |
| 63 | 1 | सय्यद अख्तर सय्यद चॉद पटेल | Plot No.88, फीरदोस गार्डन, पडेगांव, - - छत्रपती संभाजीनगर -431001 | A0015392 | 174772 | 22.11.2023 | 18.01.2024 | 08.02.2024 | ...do... |
| 64 | 1 | सोहेल अहेमद सिध्दीकी मंजूर अहेमद सिध्दीकी | Plot No.208/P/3, S.No.8, फिरदोस गार्डन पडेगांव, Z1/14/891, छत्रपती संभाजीनगर | A0033110 | 196723 | 22.11.2023 | 18.01.2024 | 08.02.2024 | ...do... |
| 65 | 1 | संभाजी इरबाजी गजले | Flat No.B-3, S.No.5/1/2/P, जयसिंगपुरा, बॉम्बे बाजार, पडेगांव, छत्रपती संभाजीनगर | A0030683 | 121433 | 22.11.2023 | 18.01.2024 | 08.02.2024 | ...do... |
| 66 | 1 | शालीग्राम सखाराम मनगटे | पडेगांव, 1-4-730, -, छत्रपती संभाजीनगर | A0018417 | 247917 | 22.11.2023 | 18.01.2024 | 08.02.2024 | ...do... |
| 67 | 1 | L.E. Sk. Syed Imtiyaz Qadri | रुपचंद कॉम्पलेक्स बारुदगरनाला, E-1, - छत्रपती संभाजीनगर | A0022160 | 99051 | 20.12.2023 | 16.01.2024 | 07.02.2024 | ...do... |
| 68 | 1 | पी.एस.सुराणा भोगवाटादार श्री. जैन | सुराणा काम्प्लेक्स, बारुदगरनाला 5TH FLOR F.NO.17, छत्रपती संभाजीनगर | A0022665 | 137101 | 20.12.2023 | 16.01.2024 | 09.02.2024 | ...do... |
| 69 | 1 | Yaqub Khan Sher Khan. | रुपचंद कॉम्पलेक्स बारुदगरनाला, B-3, - छत्रपती संभाजीनगर | A0022118 | 108733 | 20.12.2023 | 16.01.2024 | 07.02.2024 | ...do... |
| 70 | 1 | Gadiya Anandibai Motilal And Other | रुपचंद कॉम्पलेक्स बारुदगरनाला, H-2, छत्रपती संभाजीनगर | A0022148 | 127312 | 20.12.2023 | 16.01.2024 | 09.02.2024 | ...do... |
| 71 | 1 | पी.एस.सुराणा भोगवाटादार श्री. खंडागळे | सुराणा काम्प्लेक्स, बारुदगरनाला B-1, -, छत्रपती संभाजीनगर | A0022666 | 187266 | 20.12.2023 | 16.01.2024 | 09.02.2024 | ...do... |
| 72 | 1 | पी.एस.सुराणा भोगवाटादार . | सुराणा काम्प्लेक्स, बारुदगरनाला B-2, -, छत्रपती संभाजीनगर | A0022667 | 339423 | 20.12.2023 | 16.01.2024 | 09.02.2024 | ...do... |
| 73 | 1 | पी.एस.सुराणा | सुराणा काम्प्लेक्स, बारुदगरनाला SHOP NO.38, -, छत्रपती संभाजीनगर | A0022639 | 268330 | 20.12.2023 | 16.01.2024 | 07.02.2024 | ...do... |
| 74 | 1 | पी.एस.सुराणा | सुराणा काम्प्लेक्स, बारुदगरनाला SHOP NO.20, -, छत्रपती संभाजीनगर | A0022619 | 276076 | 20.12.2023 | 16.01.2024 | 09.02.2024 | ...do... |
| 75 | 1 | पी.एस.सुराणा भोगवाटादार प्रकाश लुमाड | सुराणा काम्प्लेक्स, बारुदगरनाला SHOP NO.20, -, छत्रपती संभाजीनगर | A0022620 | 240050 | 20.12.2023 | 16.01.2024 | 09.02.2024 | ...do... |
| 76 | 1 | Jawed Siddiqi S/O Mehmod Ur Rahman Siddiq | रुपचंद कॉम्पलेक्स बारुदगरनाला, -, छत्रपती संभाजीनगर | A0022162 | 361002 | 20.12.2023 | 16.01.2024 | 09.02.2024 | ...do... |
| 77 | 1 | लक्ष्मण रखमाजी घोडले | नारळीबाग 5-6-70/p, -, छत्रपती संभाजीनगर | A0014515 | 182291 | 04.12.2023 | 17.01.2024 | 06.02.2024 | ...do... |
| 78 | 1 | भागवत शेळके | CTS No.2962, ओम ऑटो समोरील रोड सवेरा पार्कीग, लाईन समोर, नारळीबाग, Z1/52/259, छत्रपती संभाजीनगर | A0042644 | 139835 | 04.12.2023 | 17.01.2024 | 06.02.2024 | ...do... |
| 79 | 1 | स.कासिम सै. इमाम | नारळीबाग 5-6-70/p- छत्रपती संभाजीनगर | A0021478 | 151804 | 04.12.2023 | 17.01.2024 | 06.02.2024 | ...do... |

**स्वाक्षरीत/-**
**उप आयुक्त-२**
**छत्रपती संभाजीनगर, महानगरपालिका**